MAHMARI 19358/13/1/2000 - TC

विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा • ठाणे

व्ही. पी. एम्.

# दिशा

वर्ष पंधरावे / अंक ९ / सप्टेंबर २०१४

## संपादकीय

### भास्कराचार्यांची ९०० वी जयंती

दोन हजार चौदा (२०१४) ला थोर गणिती भास्कराचार्यांच्या जन्माला नऊशे वर्षे पुरी होतील. या निमित्ताने विद्या प्रसारक मंडळाने १९ ते २१ सप्टेंबर २०१४ या काळात एक आंतरराष्ट्रीय परिषद भरविली होती. परदेशातून सुमारे आठ आणि भारतातून आठ संशोधक या परिषदेकरता विशेष निमंत्रक म्हणून आमंत्रित केले होते. या सर्वांचे संशोधन हे विज्ञानाचा इतिहास आणि प्रामुख्याने भारतातील गणिताचा इतिहास या विषयावरच आहे. त्यांचे शोधनिबंध हे भास्कराचार्यांच्या गणिती योगदानावर नवीन प्रकाश टाकणारे होते. शिवाय सुमारे तीस शोधनिबंध भारतातील वेगवेगळ्या राज्यांतून आलेल्या संशोधकांनी सादर केले. विद्या प्रसारक मंडळाच्या संकेतस्थळावर या सर्व शोधनिबंधांचे सारांश अभ्यासकांकरता उपलब्ध आहेत. शिवाय दिशाच्या या अंकात डॉ. आगरकर यांनी या परिषदेचा त्रोटक वृत्तान्तही सादर केला आहे.

भारताला गणिताची फार प्राचीन परंपरा आहे. एक ते नऊ आकडे आणि शून्य ही जगाला दिलेली भारताची मोठी देणगी आहे. या आकड्यांमुळेच गणिताच्या सगळ्याच क्षेत्रांमध्ये मोठी क्रांती झाली. नुसते आकडे किंवा शून्यच नाही तर गणितातले अनेक मूलभूत सिद्धान्तही भारतातील गणिततज्ज्ञांनी जगाला दिले. गणिताच्या विकासातील अनेक शाखा आणि टप्प्यांचे भारताचे योगदान आज जरी नाकारता येण्यासारखे नसले तरीही कॅलक्युलसपासून इतर अशाच अनेक भारताच्या गणिती योगदानाला मान्यता देतांना मात्र पाश्चात्य अभ्यासक खळखळ करताना दिसतात.

विज्ञानामधील कुठल्याही माहितीला प्रमाणांशिवाय मान्यता मिळत नाही. पाश्चात्त्य जगामध्ये १२ व्या शतकापासून अगदी २१ व्या शतकापर्यंत, अभ्यासकांना हवी असलेली अशी साधने मोठ्या कष्टांनी जमविली जातात, आणि त्यांचे योग्य ते वर्गीकरण करून संशोधकांना ती ग्रंथालयांमधून उपलब्धही होतात. भारताच्या गणिती किंवा भौतिक योगदानासंदर्भातील साधने ही आपल्यावर राज्य करणाऱ्या इंग्रजांनी जमविली, आणि त्यांची चांगली निगाही राखली. भास्कराचार्यांचेच उदाहरण द्यायचे तर त्यांच्या लीलावती या ग्रंथाचे घ्यायला लागेल. १२ व्या शतकापासून ते १८ व्या शतकापर्यंत लीलावतीवर सुमारे ३५ टीका लिहिण्यात आल्या. त्या लिहिणारे गणिती भारताच्या उत्तरेपासून दक्षिणेपर्यंतच्या प्रांतांतील आहेत. इंग्रह अधिकाऱ्यांनी भारतभर फिरून निदान त्यांच्या नावांची सूची करून ठेवली म्हणून आज आपल्याला त्याची माहिती तरी आहे. यांतल्या फारच थोड्या टीका प्रकाशित आहेत आणि बाकीच्या टीका शोधण्याचा फारसा प्रयत्नही झालेला नाही. जे लीलावतीचे तेच भास्कराचार्यांच्या बीजगणित, ग्रहगणित आणि गोलाध्याय या सिद्धान्तशिरोमणीच्या इतर अध्यायांचे आहे. बीजगणितावर आठ तर ग्रहगणित आणि गोलाध्यायावर सुमारे चौदा टीकांची नोंद मिळते. यांतील फारच थोड्या हस्तलिखितांचे प्रकाशन झाले आहे. भास्कराचार्यांचा दुसरा महत्त्वाचा ग्रंथ म्हणजे

(पृष्ठ क्र. २ वर)

(मुखपृष्ठावरून - **संपादकीय**)

'करणकुतूहल'. त्यावरही ८ ते १० टीकांची नोंद आहे. भास्कराचार्यांच्या गणिताच्या योगदानासंदर्भात संशोधन करायचे तर त्यांचे मूळ ग्रंथ आणि त्यांवरील जास्तीत जास्त टीका उपलब्ध असणे आवश्यक आहे.

भास्कराचार्यांच्या या ग्रंथांची भाषांतरे मराठी, कानडी, तेलगू, गुजराती, हिंदी अशा भारतातील सर्व प्रमुख भाषांमधून झाली आहेत. विसाव्या शतकाच्या आतबाहेर केल्या गेलेल्या बीजगणिताची मराठी भाषांतरेही आज उपलब्ध नाहीत. त्यांच्या लीलावती व बीजगणिताची 'फारशी' भाषांतरे अकबरापासून ते औरंगजेबापर्यंतच्या मोगल राजांच्या दरबारी केली गेली. एकोणीसाव्या शतकाच्या सुरुवातीला स्ट्रॅची या इंग्रजी अधिकाऱ्याने अकबराचा दरबारी फैझी यांनी मार्च १५८७ मध्ये फारशी भाषेमध्ये लीलावतीचे केलेले भाषांतर इंग्रजीमध्ये रूपांतरित केले (१८१३). या परिषदेमध्ये अलीगढ मुस्लीम विद्यापीठातील पदार्थविज्ञानाचे निवृत्त प्राध्यापक श्रीयुत अन्सारी यांनी भास्कराचार्यांच्या ग्रंथांच्या पर्शियन भाषांतरावर माहिती देणारा शोधनिबंध वाचला, यात भारत आणि पाकिस्तानमध्ये उपलब्ध असलेल्या अशा महत्त्वाच्या प्रतींची माहिती दिली आहे. भास्कराचार्यांच्या लिखाणाच्या तौलनिक अभ्यासाकरता ही भाषांतरे अतिशय महत्त्वाची आहेत. तरीही यांचा अभ्यास आपल्याकडे अभावानेच होताना दिसतो.

कोशकार श्रीधर व्यंकटेश केतकरांनी मराठीत ज्ञानकोशांची परंपरा चालू केली. त्यानंतर स्वातंत्र्योत्तर काळात चरित्रकोश, संस्कृतिकोश आणि विश्वकोशही निर्माण करण्यात आले. या कोशांमधील माहिती ही संशोधकांना एक मोठी पर्वणीच असते. दुर्दैवाने भास्कराचार्यांवरच्या बहुतेक सर्वच ज्ञानकोशांमधील नोंदी या माहितीचे मूळ स्रोत न तपासता दिल्या गेल्या असल्यामुळे त्यांत नवीन तर काहीच नाही, पण बरीच माहिती अपुरी आणि चुकीचीही आहे.

याच परिषदेमध्ये डॉ. एस. आर. शर्मा यांनी लीलावतीच्या कथेवर सादर केलेला शोधनिबंधही असाच परंपरागत कल्पनेला धक्का लावणारा आहे. लीलावती हा ग्रंथ भास्कराचार्यांनी आपली मुलगी लीलावती हिच्याकरता लिहिला अशी कथा महाराष्ट्रात सांगितली जाते. काही ठिकाणी ती त्यांची पत्नी होती, तर काही ठिकाणी ती त्यांच्या गुरूची मुलगी होती, अशा कथाही प्रसृत आहेत. अर्थातच त्यांची मुलगी लीलावती आणि तिच्या लग्नाची कथा ही याच कथांचा एक भाग आहे. दीक्षित, फडके आणि इतर सगळ्याच गंभीर अभ्यासकांनी यापूर्वीच ही दंतकथा असल्याचे सूचित केले आहे. या कथेचा प्रभाव एवढा आहे की लीलावतीच्या नावाने एक बक्षीसही दर वर्षी गणितात संशोधन करणाऱ्या स्त्रीला दिले जाते. डॉ. शर्मा यांनी हे दाखवून दिले आहे की, भास्कराचार्यांच्या लीलावती या ग्रंथात अथवा त्यावरील टीकांमध्येही या कथेला दुजोरा देणारा कुठलाही पुरावा उपलब्ध नाही. या कथेचा उगम हा फैझी यांनी केलेल्या पर्शियन भाषांतरात आहे. त्यांच्या भाषांतराच्या हस्तलिखितामध्ये या अर्थाचे एक चित्रही काढण्यात आले होते. तशाच अर्थाची एक जैन कथाही त्या काळात प्रचलित होती. डॉ. शर्मा यांनी या सगळ्याचा ऊहापोह त्यांच्या शोधनिबंधात करून त्यातील फोलपणा साधार दाखवून दिला आहे.

विज्ञानाच्या अभ्यास व संशोधनामध्ये वैज्ञानिक उपकरणांचे महत्त्व वेगळे सांगण्याची आज गरजच नाही. वैज्ञानिक निरिक्षणे आणि त्यांवर आधारित निष्कर्ष हे या वैज्ञानिक उपकरणांमुळेच सिद्ध होत असतात. मानवी सभ्यता आणि आधुनिकतेचा इतिहास मांडताना मानवी विकास दाखवण्याकरता मानवाच्या शिशु-तरुण-ज्येष्ठ या रूपकाचा उपयोग केला जातो. अर्थातच बाल्यावस्थेमध्ये विश्लेषण किंवा विवेकाची दृष्टी नसते की, जी नंतरच्या अवस्थांमध्ये येते असे गृहीत धरले जाते, आणि म्हणूनच, आधुनिकतेच्या आधीच्या सभ्यतेचे टप्पे 'शैशवावस्था' म्हणून धरले जातात. अर्थातच आधुनिक माणसाची बुद्धी, क्षमता आणि विवेक यांची तुलना सभ्यतांच्या या शैशवावस्थेत असणार नाही हे गृहीतच धरले जाते. म्हणूनच भव्य दिव्य, आखीवरेखीव अथवा नियोजनपूर्ण काही सापडले तर तो अपघात म्हणून गणला जातो किंवा भारतीयांवर तो पाश्चात्त्यांचा प्रभाव म्हणून धरला जातो. सुदैवाने वास्तव हे संपूर्णतः भिन्न आहे. गणित, ग्रहगणित, स्थापत्य, कृषी आणि तत्सम भौतिक गरजा भागविताना या प्राचीन सभ्यतांनी अनेक उपकरणे वापरल्याचे दिसून येते. अर्थातच मानवी कल्पकता आणि त्यांचा तत्कालीन उपयोग या

(पृष्ठ क्र. ३ वर)

व्ही.पी.एम्.

# दिशा

वर्ष पंधरावे / अंक ९ / सप्टेंबर २०१४

**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष १९ वे/अंक ३ रा)

**कार्यालय/पत्रव्यवहार**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
**दूरध्वनी : २५४२ ६२७०**
**www.vpmthane.org**

**मुद्रणस्थळ :**
परफेक्ट प्रिण्टस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
**दूरध्वनी : २५३४ १२९१**
**२५४१ ३५४६**
Email:perfectprints@gmail.com

## अनुक्रमणिका

| | | | |
|---|---|---|---|
| १) | संपादकीय | डॉ. विजय बेडेकर | |
| २) | सन यात सेन यांची समाधी | डॉ. सुधाकर आगरकर | ३ |
| ३) | वैयक्तिक आणि सामाजिक स्वास्थ्यासाठी अष्टांगयोग | डॉ. र. प्र. आठल्ये | ५ |
| ४) | मराठी दोलामुद्रिताचा इतिहास | श्री. चंद्रकांत शिंगाडे | ७ |
| ५) | प्राचीन भारतीय वैज्ञानिक परंपरा | रेवती मिलिंद कुलकर्णी | १० |
| ६) | नर्मदा परिक्रमा (भाग :८) | श्री. अरविंद ओक | १२ |
| ७) | विकासवेध-२ : कोकण रूळमार्ग | श्री. नरेंद्र गोळे | १७ |
| ८) | भारतीय संस्कृती-बीज, मॉडेल व साधना | श्री. यशवंत साने | १९ |
| ९) | भारतीय संस्कृती व हिंदू धर्माची अमेरिकन विदुषी : डायना येक | प्रा. सुभाष गं. शिंदे<br>प्रा. नारायण सं. बारसे | २४ |
| १०) | स्कॉटलंडमधील ऐतिहासिक जनमत कौल | प्रा. सुभाष गं. शिंदे | २७ |
| ११) | भास्कर ९०० या आंतरराष्ट्रीय परिषदेचा संक्षिप्त अहवाल | डॉ. सुधाकर आगरकर | २९ |
| १२) | परिसर वार्ता | संकलित | ३५ |

या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# व्ही. पी. एम. दिशाच्या संदर्भात

- ❖ आपण दिशा नियमित वाचा. इतरांनाही वाचायला सांगा.
- ❖ हे व्यासपीठ **अभ्यासपूर्ण लेखांसाठी** आहे.
- ❖ शैक्षणिक संस्थेने असे मासिक चालवावे, याचे हे एकमेव उदाहरण आहे.
- ❖ आपण विचारप्रवृत्त लेख पाठवून दिशाला सहकार्य करू शकता.
- ❖ आपण स्वत: देणगीमूल्य द्या व इतरांना द्यायला सांगा.
- ❖ आपले देणगीमूल्य द्यायचे राहिले नाही ना, कृपया पडताळून पाहा.
- ❖ दिशाच्या संदर्भात देणगीमूल्य, लेख पाठवावयाचे असतील तर कार्यवाह, विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, नौपाडा, ठाणे - ४००६०२ या पत्त्यावर पाठवा. ०२२-२५४२६२७० या क्रमांकावर संपर्क साधा.
- ❖ आपण सार्वजनिक ग्रंथालयाचे संचालक असाल वा असे एखादे ग्रंथालय चालवत असाल, तर आपण सभासद होणे अत्यंत गरजेचे आहे. महाविद्यालये, शाळा यांच्या प्रमुखांनीही आपल्या संस्थेचे देणगीमूल्य पाठवावे.
- ❖ www.vpmthane.org या संकेतस्थळावर दिशाचे जुने अंक आपण पाहू शकता.
- ❖ वार्षिक देणगीमूल्याचा रु. २५०/- चा धनादेश 'विद्या प्रसारक मंडळ A/C दिशा' या नावाने पाठवावा.
- ❖ कृपया वर्गणीदार व्हावे.

- संपादक

# सन यात सेन यांची समाधी

*आधुनिक चीनचा शिल्पकार अशी सन यात सेन यांची ओळख आहे. नॅनजिंग या शहरात त्यांच्या पार्थिवाला पुरण्यात आले. या समाधीला भेट देऊन लिहिलेला हा लेख - संपादक*

२७ व्या नवनिर्मिती स्पर्धेचे आयोजन नॅनजिंग या शहरात केलेले होते. या शहराबद्दल आणि या शहरातील काही प्रेक्षणीय स्थळांबद्दल मागील लेखात आपण वाचलेच आहे. नॅनजिंग या शहरात अनेक महत्त्वाची ठिकाणे आहेत. त्यांतील एक महत्त्वाचे ठिकाण म्हणजे सन यान सेन यांची समाधी हे होय. नॅनजिंग शहरात आलेली प्रत्येक व्यक्ती या ठिकाणाला भेट देतेच. यापेक्षा असे म्हणणे जास्त सयुक्तिक होईल की नॅनजिंग शहरात आलेल्या प्रत्येक व्यक्तीला स्थानिक मंडळी येथे आवर्जून घेऊन जातात. याचे कारणही तसेच आहे. सन यात सेन यांना आधुनिक चीनचे जनक मानले जाते. २०० वर्षांची राजेशाही मोडून त्यांनी १९११ मध्ये खऱ्या अर्थाने लोकांचे राज्य निर्माण केले. त्या एकसंध देशाचा अध्यक्ष म्हणून त्यांनी १९२५ पर्यंत कारभार पाहिला. त्या वेळचे राजधानीचे ठिकाण नॅनजिंग हेच होते. झोंगशान या गावी त्यांचा जन्म झाला. त्यांच्या पुढारपणाला बहर आला तो गॅंग्चू या शहरात. तरीही त्यांना नॅनजिंग हेच शहर आवडत होते. याचे कारण या गावात असलेली गर्द झाडी. आपल्या मृत्यूनंतर आपल्याला याच शहरात पुरण्यात यावे अशी इच्छा त्यांनी जिवंतपणीच व्यक्त केली होती. त्यांच्या इच्छेनुसार याच शहरात त्यांची समाधी बांधण्यात आली आहे.

प्रदर्शन सुरू होण्याच्या एक दिवस आधीच आम्ही नॅनजिंगला पोहोचलो. तो दिवस प्रकल्पाची आखणी करण्यासाठी ठेवलेला असतो. काम लवकर आटपा म्हणजे आपल्याला शहरातील काही महत्त्वाची स्थळे पाहता येतील असे आयोजकांनी आम्हांला आधीच सांगितले




**सन यात सेन यांच्या समाधीकडे जाणारा रस्ता**

होते. पडत्या फळाची आज्ञा मानून आम्ही आपले प्रकल्पजोडणीचे काम लवकरच आटोपले. त्यानंतर जेवणासाठी आम्ही हॉटेलला आलो. जेवण झाल्यानंतर आमची सहल सुरू झाली. त्यासाठी बसची आणि वाटाड्याची व्यवस्था करण्यात आली होती. वाटाड्याला चांगले इंग्रजी येत होते आणि तो बोलका होता. त्यामुळे प्रवासात आम्हांला खूप माहिती मिळाली. आमचे हॉटेल शहराच्या मध्यभागी होते. त्यामुळे हॉटेलच्या भोवती उंच उंच इमारती होत्या. जसजसे आम्ही शहरापासून दूर जाऊ लागलो तसतशी लहान लहान घरे दिसू लागली. काही वेळानंतर तर आम्ही जंगलातच शिरलो. रस्त्याच्या दोन्ही बाजूला उंच उंच झाडे आहेत. ती सगळी पद्धतशीर छाटून ठेवलेली आहेत. झाडांची संख्या एव्हढी की आपण एखाद्या राखीव जंगलात आलो आहोत असेच वाटते. त्या जंगलात काही अंतर गेल्यावर आमची बस थांबली. तेथून आम्ही पायी चालत एका भव्य अशा प्रवेशद्वाराजवळ

पोहोचलो. ते सन यात सेन यांच्या समाधीचे प्रवेशद्वार होते. तेथून दूर अंतरावर एक सुंदर इमारत दिसते. तिथपर्यंत पोहोचण्यासाठी सुमारे ३०० पायऱ्या चढाव्या लागतात.



**समाधीचे प्रशस्त असे प्रवेशद्वार**

सन यात सेन यांना यकृताचा कर्करोग होता. अनेक प्रयत्न करून त्यावर इलाज झाला नाही. जीवनाच्या उत्तरार्धात ते औषधोपचार घेण्यासाठी बेजिंगला गेले. तिथल्याच एका दवाखान्यात ते आपला इलाज करून घेत होते. डॉक्टरांनी प्रयत्नांची पराकाष्ठा केली. परंतु नियतीला ते मान्य नव्हते. दवाखान्यात उपचार सुरू असतानाच १२ मार्च १९२५ रोजी त्यांनी शेवटचा श्वास घेतला. त्या वेळेस त्यांचे वय ५८ वर्षांचे होते. त्यांच्या मृत्यूनंतर लगेच एक बैठक घेण्यात आली. सन यात सेन यांची इच्छा नॅनजिगमध्ये चिरनिद्रा घेण्याची होती. त्यांच्या इच्छेचा मान ठेवून त्यांच्यासाठी नॅनजिंग येथे त्यांची समाधी बांधण्याचे ठरविण्यात आले. सन यात सेनना देशात पितामहाचा दर्जा होता. एवढ्या महान आत्म्याला शोभेल असे स्मारक बांधण्याचे सरकारने ठरविले. त्यासाठी एक आंतरराष्ट्रीय स्पर्धा आयोजित करण्यात आली. समाधीची रचना करण्यासाठी काही अटी घालण्यात आल्या होत्या. त्यातील एक म्हणजे स्मारकच्या रचनेत चीनच्या प्राचीन इमारतींचे प्रतिबिंब दिसायला हवे. त्याचबरोबर संपूर्ण इमारतीचे बांधकाम ३००,००० युआन एवढ्या किमतीत झाले पहिजे. सुमारे चाळीस वास्तुविशारदांनी या स्पर्धेत भाग घेतला. त्यांपैकी लु यांझी यांची योजना एकमताने मंजूर करण्यात आली. समाधीचे काम सतत तीन वर्षे चालू होते. जानेवारी १९२६ मध्ये सुरू झालेले काम मार्च १९२९ मध्ये पूर्ण झाले. या प्रयत्नातून निर्माण झालेले स्मारक खरोखरच आकर्षक असेच आहे. डोंगराच्या उतारावर या इमारतीची रचना केलेली आहे. चहूबाजूंनी हिरव्यागार झाडांनी वेढलेल्या या इमारतीचे दर्शन विलोभनीय असेच आहे.



**समाधीचे दुरून दर्शन**

समाधीचे काम पूर्ण झाल्यावर सन यात सेनचे पार्थिव शरीर नॅनजिंगला नेण्याचे ठरविण्यात आले. बेजिंग ते नॅनजिंग हे अंतर एक हजार किलोमीटरहून जास्त आहे. त्या काळात दळणवळणाच्या सुविधा मर्यादित होत्या. ते अंतर कापायला एक आठवड्याच्या कालावधी लागला. १ जून १९२९ ला सन यात सेनचे पार्थिव एका कॉफिनमधून नॅनजिंगला आणण्यात आले.त्यानंतर रीतसर सर्व बाबी पार पडल्या. अशा पद्धतीने एक भव्य असे स्मारक उभे राहिले. याआधीच्या भेटीत आम्ही सन यात सेनच्या जन्मगावाला जाऊन आलो. तेथील प्रदर्शन आम्ही पाहिले. त्याचबरोबर गाँग्चू येथील त्यांचे स्मारकदेखील आम्ही पाहिले.

(पुढील पृष्ठ क्र....२३ वर)

# वैयक्तिक आणि सामाजिक स्वास्थ्यासाठी अष्टांगयोग

*वैयक्तिक आणि सामाजिक स्वास्थ्यासाठी योगाचे महत्त्व लेखकाने चांगल्या तऱ्हेने विशद केलेले आहे - संपादक*

योग म्हटलं की अनेकांच्या नजरेसमोर कठीण आसनं करणारे साधक येतात किंवा ध्यानस्थ मुनी! त्यामुळे समाजमनात योगाच्या वेगळ्याच प्रतिमा उमटलेल्या दिसतात. योग म्हणजे आसने किंवा योग म्हणजे ध्यानधारणा जी म्हाताऱ्याकोताऱ्यांनी करावयाची. साहजिकच मध्यमवयीन संसारी लोकांकडून योगाची उपेक्षा होते. तरुण मंडळीही जोवर तब्येतीच्या कुठल्याही तक्रारी नसतात तोवर योगाकडे वळत नाहीत. बऱ्याच वेळा असं आढळून येतं की दीर्घकाळ आजारपण सोसून व विविध उपाय करून व्याधी बरी होत नाही असे लक्षात आल्यावर अगदी शेवटचा उपाय म्हणून नाइलाजाने किंवा डॉक्टरांनीच सुचविल्यामुळे लोक योगाकडे वळतात. एके काळी शिक्षणदृष्ट्या महत्त्वाचा असलेला योग आज बराचसा उपेक्षितच झाला आहे. इतका की लोक त्रास सोसतात, औषधांवर औषधे रिचवतात, अनेक उपायांवर हजारो रुपये उधळतात; पण नेटाने योग करून व्याधिमुक्त होण्याचे टाळतात. खरंतर योग ही एक जीवनशैली आहे जी आचरली असता व्यक्तिगत व सामाजिक स्वास्थ्याचा लाभ होऊन सारे जग सुखी बनू शकते. ह्या जीवनशैलीमध्ये कुठल्याही धर्माचे अवडंबर नाही. सर्व जातीच्या, धर्माच्या लोकांना योगाचरणाने सुखाची व आनंदाची प्राप्ती होऊ शकते.

योग हा शब्द युज शब्दापासून झाला आहे ज्याचा अर्थ आहे जोडणे. योगाच्या साहाय्याने आपण शरीराला मनाशी जोडतो, आत्म्याला परमात्म्याशी जोडतो. आपल्यापुरते आपण शरीराला मनाशी जोडणे जरी लक्षात घेतले तरी ते अतिशय महत्त्वाचे आहे. असं पाहा, आपण एखादं कार्य करीत असलो व त्यामध्ये आपले मन नसले, मन इकडे तिकडे भरकटले असले तर कार्य चांगले होईल का ? पण जर काम करताना ते मनापासून केले तर ते चांगले होईल. नाही का? म्हणजे, शरीर व मनाचा योग साधला तर आपली कार्यकुशलता (कुठल्याही क्षेत्रातील) वाढेल. म्हणून म्हटले आहे ''योगः कर्मसु कौशलम्.'' शरीर व मन योगामुळे कसे जोडले जातात ते पुढे पाहू.

योगाची एकूण आठ अंगे (अष्टांग योग) आहेत. यम, नियम, आसन, प्राणायाम, प्रत्याहार, धारणा, ध्यान, समाधी. ह्यापैकी पहिल्या पाचांची साधना म्हणजे 'बहिरंग साधना' व नंतरच्या तिनांची साधना म्हणजे 'अंतरंग साधना'. सर्वसामान्य मनुष्याने नुसती 'बहिरंग साधना' जरी केली तरी वैयक्तिक व सामाजिक स्वास्थ्य साध्य होईल. ते कसे हे पाहू.

बहिरंग साधनेचे पहिले अंग '**यम**' हे सामाजिक स्वास्थ्यासाठी काय आचरावे ते सांगते. जसे -

**अहिंसा** (शारीरिक वा मानसिक हिंसा, दुःख वाटेल असे बोलणे टाळणे )

**सत्य** (सत्य बोलणे, सत्याची कास धरून चालणे)

**अस्तेय** (चोरी न करणे)

**ब्रम्हचर्य** (निदान आपल्या सहचराशी प्रामाणिक राहणे)

**अपरिग्रह** (जरुरीपेक्षा जास्त संपत्तीचा, वस्तूंचा संग्रह न करणे)

समाजात बव्हंश व्यक्ती जर यमाचे (वरील गोष्टींचे) पालन करीत असतील तर अशा समाजात भांडणे, हिंसा, खून, चोरी, लबाडी, व्यभिचार, बलात्कार, खूप गरीब व खूप श्रीमंत असा भेद ह्या गोष्टी नसतील. नाही का?

---

खरा धनुर्धारी लक्ष्य निश्चित केल्याशिवाय धनुष्यावर बाण चढवीत नाही.

**'नियम'** हे योगाचे दुसरे अंग वैयक्तिक स्वास्थ्यासाठी काय आचरावे हे सांगते. जसे -

**शौच** - म्हणजे शुद्धी, शरीराची तसे मनाचीही. ह्यासाठी धौती, बस्ती, नेती, त्राटक, नौली, कपालभाती अशा शुद्धिक्रिया (षटकर्मे) दिलेल्या आहेत. योगाची शरीरशुद्धीसाठीची साधने अगदी साधी आहेत जसे हवा, पाणी, ऊर्जा (उष्णता). तसेच ॐकार, गायत्री, त्राटकादी क्रिया मनाची शुद्धी करतात.

**संतोष** - ''चित्ती असू द्यावे समाधान.'' प्रत्येकाने समाधानी असण्याची सवय लावली तर किती चांगले होईल कारण 'जब आवे संतोषधन, सब धन धूरिसमान.'

**तप** - आपले ध्येय साध्य करण्यासाठी, कार्य तडीस नेण्यासाठी अविरत कष्ट केले पाहिजेत. तेच तप होय. तपाचा अभाव असेल तर आपली कामे कशी होणार ?

**स्वाध्याय** - म्हणजे चांगल्या संगतीत राहणे. संत तुकाराम देवाकडे मागतात ''नलगे मुक्ती आणि संपदा, संत संग देई सदा.'' कारण सज्जनांचा संग उन्नतीकडे, प्रगतीकडे नेतो तर कुसंग दुर्गतीकडे नेतो.

**ईश्वरप्रणिधान** - आपण करतो ते सारे ईश्वरार्पण करुन कार्य करणे, सारे ईश्वराच्या इच्छेने चालते असे मानून चालणे म्हणजे ईश्वरप्रणिधान.

यम व नियम दोन्हींचा नीट विचार केला तर आपल्याला नक्की जाणवेल की बव्हंश व्यक्तींनी योगाच्या ह्या दोन अंगांचे आचरण केले तरी सारे सुखी होतील, आनंदी होतील.

**योगाचे तिसरे अंग आहे आसन अर्थात योगासने**

विविध प्रकारच्या योगासनांमध्ये शरीराच्या स्नायूंवर तणाव, दबाव येऊन त्यांना योग्य व्यायाम होतो व सर्व शरीर लवचीक बनते, चपळ बनते. शरीरांतर्गत अवयवांनाही (उदा. यकृत, मूत्रपिंड, प्लीहा, पँक्रियास इत्यादी) हलका मसाज घडून त्यांची कार्यक्षमता वाढते. मधुमेह, मुतखडा अशा विकारांवरही आसनांचा चांगला परिणाम होतो.

**प्राणायाम** हे योगाचे चौथे व प्रमुख अंग आहे. अनेक प्रकारच्या शारीरिक व मानसिक व्याधींना बरे करण्याचे सामर्थ्य प्राणायामात आहे. पण प्राणायाम योग्य मार्गदर्शनाखाली करणे जरूर आहे. प्राणायामामध्ये श्वासावर नियंत्रण ठेवले जाते. श्वासाचा मनाशी संबंध आहे. मन उत्तेजित असेल तर श्वास जलद होतो व मन शांत असेल तर श्वास संथ असतो. प्राणायामात श्वासावर नियंत्रण आणून मनावर नियंत्रण आणता येते. तसेच शरीरात प्राणवायू सर्वदूरपर्यंत पोचविला जातो ज्यामुळे सर्व अवयवांमधील दोष दूर होऊन त्यांचे आरोग्य सुधारते. योगाभ्यास करताना क्रिया अशा आहेत की ज्यांत शारीरिक हालचालींबरोबर श्वासोच्छ्वास जोडलेला आहे. ह्या क्रिया करताकरताच आपल्याला शारीरिक कृतीत मन जोडणे साध्य होते आणि म्हणून आपली प्रत्येक कृती मन लावून केली जाते.

**प्रत्याहार** हे बहिरंग साधनेचे पाचवे अंग. ह्यामध्ये आपल्या इंद्रियांना चांगला आहार देणे अपेक्षित आहे म्हणजे डोळ्यांनी चांगले पाहणे, कानांनी चांगले ऐकणे इत्यादी बहिरंग साधनेनंतरची अंतरंग साधना आध्यात्मिक आहे (आत्म्याला परमात्म्याशी जोडणारी) ज्यात धारणा, ध्यान व समाधी यांचा समावेश आहे. सर्वसामान्य संसारी व्यक्तीतही तेवढी प्रगती हळूहळू होऊ शकते. पण आपले हे काम नव्हे असे म्हणून आपण जरी बहिरंगसाधना नीट केली तरी यम, नियम, आसन, प्राणायाम, प्रत्याहार यांच्या आधारे वैयक्तिक व सामाजिक स्वास्थ्य नक्कीच चांगले राखू शकू. किंबहुना असे म्हणता येईल की वैयक्तिक व सामाजिक स्वास्थ्यासाठी योग आवश्यक आहे.

**डॉ. र. प्र. आठल्ये**
बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय
ठाणे
मो. नं. ९९२००३४०५३

●●●

प्रत्येक गोष्ट चांगलीच असते असं नव्हे, पण प्रत्येक चांगली गोष्ट मात्र निःसंशय मोठी असते.

# मराठी दोलामुद्रिताचा इतिहास

*मराठी भाषेतील दोलामुद्रित ग्रंथांचा मनोरंजक आणि माहितीपूर्ण इतिहास या लेखात सांगितलेला आहे - संपादक*

**१. प्रस्तावना**

मराठी दोलामुहिताचा इतिहास हा पन्नास ते पंचावन्न वर्षापूर्वीचा आहे व त्याची सुरुवात मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयापासून होते. मराठी ग्रंथांचा संग्रह असणारी महाराष्ट्रात बरीच ग्रंथालये आहेत. अशा ग्रंथालयांच्या संग्रही असलेली ग्रंथसंपदा शोधून अशा ग्रंथांचा शोध घ्यायचा आहे की ते दोलामुद्रित ग्रंथ आहेत की नाहीत. जर दोलामुद्रित ग्रंथ असतील तर त्यांची नामावली तयार करणे आणि तो ग्रंथ, त्यांचे अस्तित्व व तो प्राप्त होण्याचे ठिकाण जाणून घेणे महत्त्वाचे आहे.

**२. मराठी दोलामुद्रिताचा इतिहास**

मुंबईमध्ये नेटिव्ह जनरल लायब्ररी १८४५ साली अस्तित्वात आली. योगायोग म्हणजे १९४५ साली बरोबर १०० वर्षांनी दुर्मीळ ग्रंथांचे प्रदर्शन मा. बाळासाहेब खेर यांच्या अध्यक्षतेखाली भरविण्यात आले व त्याचे उद्घाटन प्रा.अ.का. प्रियोळकर यांच्या हस्ते झाले. त्या वेळी प्रथम मराठी दोलामुद्रितांसंबंधीचा विचार त्यांनी भाषणात मांडला. तेथूनच खरी मराठी दोलामुद्रिताच्या इतिहासाची सुरुवात होते.

**३. दोलामुद्रित शब्दाचा उगम**

प्रा. प्रियोळकरांनी भाषणादरम्यान मराठी दोलामुद्रितासंबंधीचे जे विचार मांडले ते असे - 'दोलामुदित' हा शब्द मी Incunabula या शब्दाबद्दल योजला. Cunae म्हणजे लॅटिन भाषेत 'पाळणा'. पाळण्यास संस्कृत भाषेत 'दोला' असे नाव आहे. Incunabula म्हणजे पाळण्यातील मुद्रित ग्रंथ. युरोपात मुद्रणकला १५ व्या शतकात अस्तित्वात आली. या शतकात जे ग्रंथ मुद्रित झाले त्यांना बाल्यावस्थेतील म्हणजे पाळण्यातील ग्रंथ अशी संज्ञा आहे. म्हणजेच प्रा. अ. का. प्रियोळकर यांनीच Incunabula या संज्ञेसाठी मराठीत दोलामुद्रित ही संज्ञा दिली असे त्यांच्या भाषणावरून समजले व ती आता रूढही झाली आहे.

**४. मराठी दोलामुद्रिताचा कालावधी**

दोलामुद्रिताचे महत्त्व हे त्याच्या प्रकाशन कालावधीवर अवलंबून असते. प्रा. अ. का. प्रियोळकरांनीच मराठी दोलामुद्रिताचा कालावधी मान्य केलेल्या आहे. पहिल्यांदा तो इ.स. १८५० वरून इ.स. १८६७ असा केला. कारण युरोपातील मुद्रितांचा कालावधी इ.स. १५०० पर्यंतचा आहे. त्यामुळे १८५० हा कालावधी आपल्याकडील दोलामुद्रितांचा मानावा असे प्रियोळकरांनी आपल्या भाषणात व्यक्त केले होते. परंतु मराठी दोलामुद्रितांव्यतिरिक्त इतर भाषेचा विचार केला नाही. गुजराती दोलामुद्रितांचा संग्रह त्या वेळी प्रियोळकर करीत होते. त्या वेळेस त्यांना असे दिसून आले की, गुजराती मुद्रणाचे कार्य प्रारंभी पारसी लोकांना केले आहे. गुजराती, हिंदू व मुसलमान फार उशिरा या क्षेत्रात शिरले. मुंबई येथील फार्बस गुजरात सभा व अहमदाबाद येथील गुजरात व्हर्नाक्युलर सोसायटी या संस्थांतील दोलामुद्रितांची तपासणी केली. त्यावरून असे कळले की १८५० पर्यंतचे गुजराती मुद्रित ग्रंथ हे पारसी लोकांचे आहेत. हिंदू किंवा मुसलमान लोकांनी मुद्रित केलेले ग्रंथ फारच थोडे निघतील. तेव्हा १८५० ही दोलामुद्रितांची जी कालमर्यादा आहे ती सर्वांना मान्य होणे कठीण आहे. म्हणून त्यांनी ती अमान्य ठरवली व पुढे ती १९०० पर्यंत असावी असा ही तर्क चालविला होता; परंतु १९०० ही कालमर्यादा फारच जवळची वाटते म्हणून तीसद्धा अमान्य झाली व ती पुढे १८५० वरून १८६७ करण्यात आली.

शहाणी माण्से काल केलेल्या चुका आज करत नाहीत.

इ.स. १८५० वरून इ.स. १८६७ ही कालमर्यादा ठरविताना १८६७ ला महत्त्वपूर्ण असा पुस्तकांसंबंधीचा २५ वा अॅक्ट पास झाला होता. त्यामुळे १८६७ नंतर मुद्रित ग्रंथांची व्यवस्थित नोंद होत गेली. परंतु १८६७ पूर्वी जी मुद्रिते होती ती व्यवस्थित मिळत नव्हती किंवा त्यांची व्यवस्थित नोंद झालेली नव्हती. त्यामुळे अशा १८६७ पूर्वीच्या मुद्रितांना जास्त महत्त्वाचे मानून त्यांना दोलामुद्रिते म्हणावे असे प्रियोळकरांनीच भाषणात जाहीर केले. त्या वेळी हा कालावधी बऱ्याच जणांना योग्य वाटला. त्यात मराठी सूचिकार शंकर गणेश दाते यांना हा कालावधी पसंत पडला व तेव्हापासून १८६७ ही कालमर्यादा मराठी दोलमुद्रितांसाठी ठरविण्यात आली.

**५. मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय आणि मराठी दोलामुद्रिते**

मराठी दोलामुद्रितांचा पहिला प्रयत्न मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयामध्ये झाला. १८६७ ही कालमर्यादा दोलमुद्रितांसंबंधी ठरविण्यात आली व ती सर्वमान्य झाली. त्या वेळेला मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाने 'गुंजीकर व्याख्यानमाला' जी सुरू केली तिच्यामध्ये हाच कालावधी स्वीकारण्यात आला होता. पुढे १९४९ साली मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाचा सुवर्णमहोत्सव साजरा झाला. त्या वेळेला १८४८ पर्यंत संग्रहालयात संग्रही असलेल्या दोलामुद्रितांची यादी प्रसिद्ध करण्यात आली. ही यादी संस्थेचे त्या वेळचे ग्रंथपाल रा.पु.ह. सहस्रबुद्धे यांनी तयार केली होती. तीच पुस्तकरूपाने मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयातील इ.स. १८६७ अखेरपर्यंतच्या मराठी मुद्रित ग्रंथांची वर्णनात्मक नामावली रा. रा. अ. का. प्रियोळकरांच्या ग्रंथवर्णन व संरक्षण या विषयावरील प्रास्ताविक निबंधासह प्रसिद्ध झाली. अशा स्वरूपात मराठी दोलमुद्रितांच्या बाबतीत पहिला आविष्कार घडून आला. या यादीत १९४८ पर्यंतच्या मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयात समाविष्ट असलेल्या ग्रंथांचा समावेश झाला आहे. अशा नोंदी जवळजवळ २९३ आहेत.

**६. प्रा. सुरेंद्र गावस्कर आणि मराठी दोलामुद्रिते**

प्रा. सुरेंद्र गावस्कर यांनी 'मराठी दोलामुद्रिते' ही दुसरी आवृत्ती १९६१ साली संपादित केली. प्रा. गावस्करांच्या रूपाने मराठी दोलमुद्रितांविषयीचा हा दुसरा प्रयत्न होता. त्या वेळी त्यांनी नुकताच ग्रंथालयशास्त्राचा डिप्लोमा केला होता. पहिल्या यादीत जी दोलामुद्रिते आहेत त्यांपेक्षा इतर ठिकाणच्या ग्रंथालयांशी संपर्क साधून त्यांमध्ये काही भर घालता ते का म्हणून त्यांनी प्रयत्न चालू केले. महाराष्ट्रांतील ग्रंथालयांशी पत्र व्यवहार करून त्यांच्या संग्रही असलेल्या दोलामुद्रितासंबंधीच्या याद्या पाठविण्याचे आवाहन केले व त्यांनी तसा प्रयत्न चालू केला. त्याला मात्र म्हणावा तसा प्रतिसाद मिळाला नाही. पहिल्या यादीपेक्षा ५५१ ग्रंथांची भर घालून एकूण ८४४ ग्रंथसंख्या असलेली संयुक्त मराठी दोलामुद्रितांची नामावली १९६१ साली मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाने प्रसिद्ध केली. १९४९ ते १९६१ जवळजवळ ११ वर्षांच्या कालावधीने मराठी दोलामुद्रितांविषयीची दुसरी आवृत्ती प्रसिद्ध झाली.

**७. डॉ. गंगाधर मोरजे आणि मराठी दोलामुद्रिते**

मराठी दोलामुद्रितांचा प्रवास हा इतर विषयांप्रमाणे जलद घडून येत नाही हे पहिल्या आणि दुसऱ्या आवृत्तीमधील कालावधीवरून समजून येते. 'मराठी दोलामुद्रिते' ही तिसरी आवृत्ती १९९५ साली डॉ. गंगाधर मोरजे यांनी संपादित केली. दुसऱ्या आवृत्तीनंतर जवळजवळ ३४ वर्षांनी तिसरी आवृत्ती १९९५ साली गोमंतक मराठी अकादमीने प्रकाशित केली.त्यासाठी संपादक डॉ. मोरजे आणि सहसंपादक गोविंद काळे यांनी अथक परिश्रम घेतले.

महाराष्ट्रातील विविध ठिकाणच्या ग्रंथालयांत जाऊन, अनेकांचे खाजगी ग्रंथसंग्रह तपासून त्यांनी ह्या नोंदी जमविल्या आहेत. डॉ. मोरजे यांना परदेशवारी करण्याची संधी आली. तेव्हासुद्धा त्यांनी परदेशातील विविध ग्रंथालयांना भेटी देऊन मराठी दोलामुद्रितांच्या नोंदी जमविल्या. त्यांच्या या अजोड प्रयत्नांनी दुसऱ्या आवृत्तीतील दोलामुद्रितांत १०५६ ची भर घालून १९०० मराठी दोलामुद्रिते ज्ञात करण्यात तिसरी आवृत्ती यशस्वी झाली. मराठी दोलामुद्रितांसंबंधीचा हा तिसरा प्रयत्न म्हणता येईल.

### ८. पुणे विद्यापीठ आणि मराठी दोलामुद्रिते

डॉ. शां. ग. महाजन यांनी मराठी दोलामुद्रितांची तालिका संकलित केली आहे. पुणे विद्यापीठाच्या जयकर ग्रंथालयात समाविष्ट असलेल्या मराठी दोलामुद्रित ग्रंथांची ही तालिका असून ती पुणे विद्यापीठाने १९८९ साली प्रसिद्ध केली.

एकूण १०७ मराठी दोलामुद्रित ग्रंथ आढळून आले. डॉ. महाजन यांनी तयार केलेली सूची ही ४० पानांची असून त्यात २६ पृष्ठांत मराठी दोलामुद्रितांची यादी कालानुक्रमे दिलेली आहे. या तालिकेचे वैशिष्ट्य असे की डॉ. महाजन यांनी प्रत्येक ग्रंथाचे अवलोकन करून प्रस्तुत सूची तयार केली. त्यामुळे दोलामुद्रित ग्रंथांचे काटेकोर वर्णन देण्यावर त्यांनी भर दिलेला आहे. एकूणच जयकर ग्रंथालयाच्या प्रस्तुत उपक्रमामुळे वाचक व प्राध्यापक यांची फार मोठी सोय झालेली आहे.

पुणे विद्यापीठाने मराठी दोलामुद्रितांचा शोध घेऊन त्यांची तालिका प्रसिद्ध केली. परंतु त्या सूचीचा मात्र १९९५ च्या 'मराठी दोलामुद्रिने' या तिसऱ्या आवृत्तीत समावेश झाला नाही. त्यामुळे ही सूची थोडीशी दुर्लक्षित राहिलेली आहे असे म्हणावे लागते.

डॉ. महाजन यांनी ही सूची १९६४-६५ सालात तयार केली असून त्या वेळी ती सूची चक्रमुद्रित स्वरूपात होती. नंतर ही सूची पुणे विद्यापीठाने १९८९ साली स्वतंत्र पुस्तिकेच्या रूपाने प्रकाशित केलेली असल्याने आजच्या अभ्यासकांना व वाचकांना डॉ. महाजन यांची सूची अवलोकानार्थ उपलब्ध आहे. पुणे विद्यापीठाने घालून दिलेला आदर्श इतर विद्यापीठांनीही बाळगावा की जेणेकरून त्यांच्या संग्रही असलेली दोलामुद्रिते ज्ञात होतील व अभ्यासकांची सोय होईल.

### ९. प्रा.अ.का.प्रियोळकरांचे योगदान

'मराठी दोलामुद्रिते' या विषयाच्या मूळ कल्पनेपासून ते या दोलामुद्रिते संज्ञेपर्यंत मराठी भाषेतील संशोधनक्षेत्राला प्रा. प्रियोळकरांचे महत्त्वपूर्ण योगदान आहे. मराठी संशोधक म्हणून साहित्यक्षेत्रात प्रियोळकरांचे योगदान कधीच विसरता येणार नाही. त्यांनी ग्रंथांविषयी विपुल लेखन व संशोधन केले आहे. मुद्रणकलेपासून ते दोलामुद्रिते या क्षेत्राचा अभ्यास त्यांनी केला. दोलामुद्रित संज्ञेचे जनक ही तेच होते. थोर संशोधक, भाषाशास्त्रज्ञ, साहित्यिक व मुंबई, मराठी संशोधन मंडळाचे पहिले संचालक इत्यादी बाबतींत प्रियोळकरांना ओळखले जाते. गोमंतक ही त्यांची जन्मभूमी त्यांची असून मुंबई ती कर्मभूमी आहे. १९४९ साली त्यांच्याच मार्गदर्शनासाठी 'मराठी दोलामुद्रिते' हा महत्त्वाचा अभ्यसनीय ग्रंथ प्रकाशित झाला. या ग्रंथाला दिलेल्या प्रस्तावनेत प्रस्तुत ग्रंथाविषयी अभ्यासपूर्ण विवेचन केले आहे. अशा तऱ्हेचा ग्रंथ मराठीत व्हावा असा ध्यास त्यांनी घेतला होता व तो होण्यासाठी अथक प्रयत्नही केले होते. 'ग्रंथवर्णन व ग्रंथसंरक्षण' या विषयावरील प्रास्तविक निबंधासह, विषयाची व्यापक माहिती व संशोधन या दृष्टीने ही प्रस्तावना लक्षणीय नमुना आहे. मराठी दोलामुद्रितांचा इतिहास समजून घेताना प्रा. प्रियोळकरांचे योगदान महत्त्वपूर्ण आहे.

### १०. समारोप

१९४९ ते १९९५ सालांत मराठी दोलामुद्रितांसाठी झालेले प्रयत्न लक्षात येतात. अनेक संस्थांचे व व्यक्तींचे लाभलेले योगदान समजून येते. प्रा.अ.का. प्रियोळकर, डॉ. डी. एन. मार्शल, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, प्रा. सुरेंद्र गावस्कर, पुणे विद्यापीठ, शां. ग. महाजन, डॉ. गंगाधर मोरजे व डॉ. प्रदीप कर्णिक इत्यादींचे योगदान असल्याचे दिसून येते. १८६७ पूर्वीची दोलामुद्रिते ज्ञात होत गेल्याने अभ्यासकांना त्या त्या परिस्थितीचा अंदाज घेता येणे शक्य होते. शिवाय त्या-त्या परिस्थितीत वाङ्मयीन वेध घेता येतो. १८६७ पूर्वीच्या मुद्रितांना विशेष मानून त्यांचा शोध घेणे आवश्यक आहे. अशी दोलामुद्रिते व दुर्मीळ ग्रंथांचे जतन करणे फार आवश्यक आहे. ठाण्यातील प्राच्य विद्या अभ्यास केंद्राच्या जतनासंदर्भाबद्दल डॉ. विजय बेडेकरांचा लढा सर्वश्रुत आहे. १८०० ते १८६७ हा कालखंड म्हणजे मराठीतील मुद्रणाची बाल्यावस्था होय. अशा बाल्यावस्थेतील मुद्रित ग्रंथांना शोधून ते ज्ञात करणे हे आज आपल्यापुढील एक मोठे आव्हान आहे.

**चंद्रकांत शिंगाडे**
ग्रंथालय सहायक
वि. प्र. मंडळाचे तंत्रनिकेतन
ठाणे - ४०० ६०१

जो खोटं बोलायला घाबरतो, तो अन्य कशालाही भीत नाही.

# प्राचीन भारतीय वैज्ञानिक परंपरा

*भारताला विज्ञानाची मोठी परंपरा आहे. त्या परंपरेची माहिती महाविद्यालयात शिक्षण घेणारी विद्यार्थिनी आपल्याला करून देत आहे - संपादक*

२८ फेब्रुवारी हा ‘राष्ट्रीय विज्ञान दिन’. त्या निमित्ताने विज्ञानात प्राचीन भारताची प्रगती किती झाली होती आणि त्या प्रक्रियेतील संस्कृतचे स्थान पाहणे, मार्गदर्शक आणि मनोज्ञ ठरेल. ‘विशिष्टं ज्ञानं विज्ञानम्।’ अशी विज्ञानाची व्याख्या भारतात करण्यात आली होती. कौटिलीय अर्थशास्त्रात चौलकर्म म्हणजेच मुलाचे जावळ केल्यावर त्याला लिपी व संख्या शिकवायला सुरुवात करावी, असे म्हटले आहे. छांदोग्य उपनिषदातील सातव्या अध्यायाच्या सुरुवातीलाच ‘विज्ञानाने अनेक विषयांचे आकलन होते, म्हणून विज्ञानाचा अभ्यास करावा, असे म्हटले आहे. आधुनिक काळात विज्ञान विषयाचे स्थूलमानाने ४ प्रकारे वर्गीकरण करण्यात येते -

१) गणित - तर्कशास्त्र

२) भौतिक विज्ञान (रसायन, भूगर्भ, भौतिक, हवामान, खगोलशास्त्र)

३) जीवशास्त्र

४) सामाजिक विज्ञान (अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, मानसशास्त्र इ.)

यांपैकी भौतिकशास्त्र व जीवशास्त्र मुख्यत्वे विज्ञान मानले जातात व इतर विषय साहाय्यकारी विषय ठरतात. विस्तारभयास्तव आपण केवळ गणित व रसायनशास्त्राचा विचार करू या.

**गणित**

वैदिक काळात निरनिराळ्या आकारांच्या यज्ञवेदी असत. यज्ञकर्मात जराशी चूक झाली तरी यज्ञफल मिळणार नाही, याची खात्री असल्यामुळे त्याच्या प्रत्येक कोनाचे अचूक मोजमाप घेतले जात असे. कल्पसूत्रांतर्गत ‘बौधायनाचे शुल्बसूत्र’ येते. शुल्ब याचा अर्थ दोरी. दोरीने अचूक मोजमाप घेऊन यज्ञवेदी निर्माण केल्या जात, म्हणून त्यांना शुल्बसूत्र म्हटले आहे. विशिष्ट यज्ञ विशिष्ट ग्रहस्थितीत फळतो म्हणून ज्योतिर्गणित भारतात विकसित झाले. त्यामुळेच अंकगणित, रेखागणित, ज्योतिर्गणित, त्रिकोणमिती अशा गणिताच्या वेगवेगळया शाखांमध्ये ख्रिस्तसनापूर्वीच भारताने प्रगती केली होती.

गणिताविषयी ग्रीकांचे ज्ञान दहाचा चौथा व रोमनांचे दहाचा तिसरा घात इतकेच असताना भारतात मात्र दहाच्या अठराव्या घातापर्यंत मजल गेलेली होती. स्थानमाहात्म्याने अंक वापरण्याची पद्धत (place value of digits) भारतात इ.स. पूर्व तिसऱ्या शतकापासून होती. पाश्चात्त्य जगात प्रसिद्ध असलेला 'Pascal Triangle' ‘मेरुप्रस्तर’ या नावाने भारतात सुपरिचित होता. याचे विवेचन पिंगलाने छंदशास्त्रात (इ.स. पूर्व ३ रे शतक) केले आहे. आर्यभट्टाने (इ.स. ४९९) पायचे मूल्य ३.१४१६ असे दिले आहे व ते अचूक नसून ‘आसन्न’ असल्याचाही उल्लेख केला आहे. संख्यांची दशमानपद्धती युरोपात १० व्या शतकापासून सापडते तर भारतात इ.स.पूर्व तिसऱ्या शतकापासून सापडते.

‘पायथागोरस सिद्धान्त’ म्हणून प्रसिद्ध असलेला सिद्धान्त बौधायनाने फार पूर्वीच शुल्बसूत्रात दिलेला आहे. न्यूटनचा ‘साइन फॉर्म्युला’ त्याच्या ३०० वर्षे आधी माधव या गणितज्ञाने दिला होता व तो फॉर्म्युला आता ‘माधव-न्यूटन फॉर्म्युला’ या नावाने ओळखला जातो. ब्राह्मस्फुटसिद्धान्त’ या खगोलशास्त्र व गणितावरील

ग्रंथाचे एका खलिफाने 'अल अर्कन्द' असे अरबी भाषांतर करवून घेतले. उत्तरोत्तर भारताच्या प्रगत गणिताचा पाश्चात्त्यांना परिचय झाला. पण ख्रिश्चन धर्मगुरूंनी हिंदूंचे गणित स्वीकारायला विरोध केल्यामुळे २५०-३०० वर्षे त्यावर बंदी होती. नंतर ब्रिटिश व्यापाऱ्यांनी त्याचा उपयोग सुरू केला व तो सर्वत्र रूढ झाला.

**रसायनशास्त्र**

इसवी सन पूर्व ३ ते ४ हजार वर्षांपूर्वीपासून रसायनशास्त्रातील प्रगतीचे संदर्भ सापडतात. मुळात आयुर्वेदाचे एक अंग म्हणून त्याचा विकास झाला. चरक, सुश्रुत, वाग्भट, नागार्जुन हे सारे आयुर्वेदज्ञ रसायनशास्त्रातील तज्ज्ञ होते. रसरत्नाकर, चक्रदत्त, सिद्धयोग, रसार्णव, रसहृदय, रसेन्द्रचूडामणी, रसप्रकाश अशा रसायनशास्त्रावरील प्राचीन ग्रंथांची मोठीच यादी मिळते. आयुर्वेदात निरनिराळ्या धातूंच्या भुकटीचा (पावडर) उपयोग केल्याचे उल्लेख आहेत. इ.स.पू. ५ व्या शतकातील उत्खननात काचेच्या (उच्च प्रतीच्या) वस्तू सापडल्या आहेत. आयुर्वेदात पाऱ्याचा उपयोग बऱ्याच मोठ्या प्रमाणात होत होता. संस्कृतात पाऱ्याला 'रस' असे म्हटले जाते. साधारणपणे तेराव्या शतकातील 'रत्नसमुच्चय' या ग्रंथात 'रसानात्सर्वधातूनां रस इत्यभिदीयते' रस म्हणजे पारा सर्व धातूंचे रसन म्हणजे भक्षण करतो म्हणून त्याला 'रस' म्हणतात, असे सांगितले आहे. याबरोबरच पाऱ्याचे विविध प्रकार व प्रक्रिया प्राचीन काळापासून अस्तित्वात होते.

इ.स. ३ ऱ्या शतकातील 'कौटिलीय अर्थशास्त्र' या ग्रंथात अध्यक्षीय प्रचार नावाचे अधिकरण आहे. यातील १२ ते १४ हे अध्याय भारतीयांची धातुशास्त्रातील प्रगती दर्शवतात. धातूंचे आधुनिक रसायनशास्त्रातील तन्यता, वर्धनीयता (ductility, malleability) इ. गुणधर्म प्राचीन भारतीयांना ज्ञात होते. वर उल्लेखलेला १३ वा अध्याय सोन्यावरील प्रक्रियांविषयी आहे. सोन्याचे उत्तम दागिने घडवणे, त्यांतले सूक्ष्म तपशील (बारीक तारा बनवणे, रत्न जडवणे, मण्यांची माळ बनवणे इ.) या बाबतीतले तत्कालीन ज्ञान व तंत्र खरोखर प्रगत होते. भारताच्या म्हैसूर प्रांतातून पूर्वी पोलादनिर्मिती होत असे. त्यापासून बनवलेल्या तलवारींचे, इतर शस्त्रास्त्रांचे सर्वत्र (भारताबाहेर जगातसुद्‌धा) कौतुक होत असे.

भारतीयांचे रसतंत्रज्ञान किती प्रगत होते, याचे उत्तम उदाहरण म्हणजे दिल्ली येथील मेहरौली गावातील लोहस्तंभ. हा स्तंभ इ.स. ४०० मध्ये विक्रमादित्याने हूणांवरील विजयाचे प्रतीक म्हणून मथुरेला उभारला. पुढे अनंगपालाने तो दिल्लीला नेला. तिथे एकूण २७ मंदिरे होती. कुतुबुद्‌दिन ऐबकाने ती मंदिरे उद्‌ध्वस्त केली, पण हा स्तंभ त्याला उद्‌ध्वस्त करता आला नाही. या स्तंभाचे वजन ६ टन आहे. विशेष म्हणजे आज इतकी वर्षे होऊनही हा लोखंडाचा स्तंभ गंजलेला नाही. भारतीयांची विज्ञानातील अशी प्रगती भारताबाहेरील जगातदेखील कौतुकाचा विषय होती. सैद अल अन्दलुसी नावाचा खगोलशास्त्रज्ञ आणि विज्ञानसंशोधक आपल्या एका ग्रंथात राष्ट्रांचे २ प्रकारे वर्गीकरण करतो. विज्ञानाची आवड नसलेली राष्ट्रे आणि विज्ञान रुजवलेली राष्ट्रे. त्या वर्गीकरणात त्याने भारताला विज्ञान रुजवलेल्या राष्ट्रांच्या गटात प्रथम स्थान दिले आहे.

अशा प्रकारे प्राचीन काळापासूनच आपला देश ज्ञानविज्ञानाने समृद्‌ध होता. मात्र हे उपयुक्त ज्ञानभांडार आपल्याला संस्कृत अवगत असल्यामुळे उपलब्ध झाले, हेही लक्षात घ्यायला हवे. तेव्हा आपण विज्ञान व संस्कृत दोघांप्रति निष्ठा आणि सद्‌भवना ठेवू या व त्यांना वृद्‌धिंगत करू या !

**रेवती मिलिंद कुलकर्णी**
द्वितीय वर्ष - कला (संस्कृत)

**संदर्भ -**

दै. लोकसत्ता वृत्तपत्रातील २८ फेब्रुवारी, २०१४ रोजीचा डॉ. आसावरी (पद्‌मा) बापट यांचा लेख.

धैर्य, चिकाटी, प्रामाणिकपणा, सहानुभूती हे असे सद्‌गुण आहेत, की ढोंगी लोकांना याची फार काळ नक्कल करता येत नाही.

# नर्मदा परिक्रमा

**भाग : ८**

*नर्मदा परिक्रमेतील हा पुढचा टप्पा. लेखकाचे चौफेर निरीक्षण, भेटलेली माणसे या नोंदी वाचण्यासारख्या आहेत- संपादक*

**दिवस २६ वा - हनुमान टेकडी - कठपोर**

सकाळी ५ पासून उठलो तरी निघालो ६॥ वाजता कारण कठपोर हे पुढचे ठिकाण जवळच होते.

रस्ता तसाच रुंद, खडीचा, निर्वृक्ष, ओसाड परिसर, थोड्याच वेळात कठपोर गाळले, हे एक छोटे गाव आहे. गावात स्वाध्याय आहे. गावाबाहेर दूर मोठी छान धर्मशाळा आहे. काम अजून अपूर्ण आहे; परंतु मोठमोठे हॉल, पाण्यासाठी खूप मोठी टाकी, तिला चारी बाजूला भरपूर तोट्या !

कठपोर धर्मशाळेत उतरलो. एक ४० जणांचा गट नाविकतळाहून परतताना दिसला. नाव नादुरुस्त झाल्याने हा गट परत पाठविला गेला. वेळ आहे, नावाही अजून उभ्या आहेत कळल्याने मी व अशोक किनाऱ्यावर गेलो. सर्व गट गटानुसार अलग अलग बसले होते. एकेका गटाला एकेका नावेत जाण्याचा संदेश मिळत होता. मऊ चिखलावरुन पाच-एक मिनिटे चालल्यावर नावेत चढता येत होते. नावेजवळ पाणी दोन-एक फुटांहून कमी वाटते.

अशोकने या उपफतमाचे चित्रण केले. व्यवस्था अशी होती की धर्मशाळेत दाखल झालेल्या परिक्रमावासींनी ४० चा लेखी नावांसहित गट करून पैसे जमा करून ते द्यायचे. एकूण संख्या पाहून त्यानुसार नावांची संख्या ठरते. काही नावात ७५ सीटच्या. त्यात संख्या कमी तर नाव जात नाही. आज ४० चा गट परतला तो यामुळेच.

इथेही बसने परिक्रमा करणाऱ्यांना प्राधान्य असावेसे वाटते कारण त्यांच्याकडून अधिक प्राप्ती होत असावी. आकडा नंतर कळेलच. नावा म्हणजे मोटर लॉन्च आहेत. भरती ओहोटीनुसार त्या सुटतात. एकाच वेळी सर्व जण पैलतीरी जातात, नंतर दुसऱ्या भरतीला नावा परततात. दिवसातून एकदाच नावा जातात. आज सकाळी सहापासून सगळे गट तळावर सांगितल्यानुसार जमा झाले, पण नावा मात्र सकाळी ९॥-१० च्या सुमारास रवाना झाल्या. किनाऱ्यावर भर ऊन, सगळे गट तिथेच, खाडी प्रदेश असल्यामुळे सावली कुठून ?

नावा सुटल्यावर आम्ही परतलो. स्नान करून कपडे गच्चीवर वाळत घातले. १० मीटर X ४० मीटर मापाची ही धर्मशाळा L आकाराची आहे. त्यातली छोटी लांबी मात्र मी मापली नाही. सुसज्ज शौचालयेही आहेत, वर पाण्याच्या टाक्या आहेत.

दुपारी भात वरण भोजन एक + एक भाकरीवजा पोळा. वरण किंवा भाजी हा द्रव तिखट होता. भात थोडा हवा सांगूनही खूप वाढला नंतर ही रोटी ! अर्धी खाल्ली, उरलेली अर्धी संध्याकाळी गावात जाताना वाटेत हळूहळू खाल्ली. अन्नब्रह्म आहे, वाया घालवायचे नाही. नर्मदे हर!



सकाळी गावात शिरताना चौकशी केली तेव्हा कळले की स्वाध्याय आहे. नाव विचारून विमलेश या स्वाध्यायीचे दार ठोठावले. 'चहा घेऊन जा' असे तो म्हणाला. मी एकटाच पुढे आलो होतो. नंतर जाऊन अशोक व मंगलला घेऊन परत आलो तेव्हा तो भाऊ नव्हता म्हणून घरातील एका प्रौढ स्त्रीला विचारले तर तिने 'विमलेश नाही' असे सांगितल्याने आम्ही न थांबता सरळ धर्मशाळेत निघून आलो होतो.

संध्याकाळी ४ ।। वाजता गावात परत गेलो. एका दुकानात पेन घेईपर्यंत स्वाध्यायाची चौकशी करत असताना एक भाऊ दुकानात आला, तो स्वाध्यायी आहे असे दुकानदाराने सांगितले.

आग्रहावरून 'दीपक' भाऊच्या घरी गेलो. दोन कप चहा झाला. मला हवी असलेली वॉटरप्रुफ किन्ताने काढून ठेवायला दुकानात सांगून आलो होतो, तीही दीपककडून मला मिळाली. गावात १२ पासून स्वाध्याय आहे.

रात्रीपर्यंत २-३ बस, २-३ लहान गाड्या आल्या आणि कुणकुण लागली की पायी परिक्रमा करणारे दोन दिवस इथेच राहतील. बाबांना भेटायला गेलो तर बसवाले देत असलेल्या मोठ्या देणग्या घेण्यात बाबा मग्न होते. आम्ही ३-४ जण होतो, त्यांच्यासाठी वेळ नसावा, लक्षही दिले नाही.

दरम्यान मंगलने लालाभाईला फोन लावला, त्याने कुणा कमलभाईला भेटायला सांगितले.

बाबांनी दखल घेतली. पायी जाणाऱ्यांनी उद्या कधी जायचे याचा संदेश रात्रीचे ९॥ झाले तरी आला नाही तेव्हा ते म्हणाले, दोन बोटी बिघडल्याने काही जणांना थांबावे लागणार आहे. 'बसवालेसुद्धा यात येतात की नाही?' यावर कुणी बसवाला म्हणाला की अशा प्रत्येक दिवसासाठी गुजरात सरकारला १०,००० रु. भरायला लागतात म्हणून बसयाची प्राध्यान्यतेने नेले जातात.

म्हणजे हा सारा पैशांचा खेळ आहे. यावर बाबा म्हणाले, आणीबाणी असेल तर त्याची काळजी आम्ही घेऊन त्यांना पार करतो.

आमची ४० जणांची लिस्ट कापली होती. मी म्हटले, सर्व ४० जणांसाठी विनंती आहे. यावर बाबांनी धुळे मुंबईच्या ८ जणांना उद्या नेण्याची तयारी दाखविली आहे.

प्रत्यक्षात उद्या काय होते पाहू या.

रात्री एक मौनीबाबा गिटार वाजवीत होते. अगोदर ते इतरांना भजनाची साथ करीत होते; परंतु आम्ही भजनानंतर त्यांना काही चित्रपट संगीत वाजवायला सांगितले तर सुरुवातीला नागिनची धून वाजविली व नंतर एकापेक्षा एक सुंदर सुरावरी वाजविल्या.

झोपेची वेळ टळून गेली तरी आमच्या हॉलमध्ये भजनाचा दणदणाट सुरू होता. शेवटी कंटाळा आला. या त्रासामुळे आश्रमांमध्ये उतरणे नको वाटते.

**दिवस २७ वा - कठपोर-मिठीतलाई नावेचा प्रवास २७ किमी. ४ तास १५ मिनिटे.**

भरतीचे पाणी आल्याशिवाय नावा निघत नाहीत काल नावा १० वाजता निघाल्या तर आज ११। वाजता पहिली नाव निघाली. सुदैवाने होते तेवढे सगळे जण पार झाले, कुणीही मागे राहिले नाही. नाव बिघडली म्हणून काल ४० चा एक गट परत फिरविला होता.



ठाम व ठोस भूमिका घेतल्याने तात्पुरता तोटा होत असला तरी अंतिमतः ते फायदेशीरच ठरतं.

सकाळी ७ वाजताच सर्वांना बाहेर काढले. ११। पर्यंत फक्त प्रतीक्षा किनाऱ्यावर भजन/गाण्यांना ऊत आला होता. काही स्त्री-पुरुष बेधुंद नाचत होते. अधेमधे सर्व जण दोन्ही हात उंचावून 'नर्मदे हर' चा गजर करीत होते.

किनाऱ्यावरील मातीत/रेतीत उगविलेली वनस्पती कुणी खुडून आणली. झाले, एकामागे एक असे सगळे त्याच कार्याला लागले. तिथली जमीन साफ झाल्यावर कुणाचेतरी दूर उजवीकडे लक्ष गेले. तिथे आहे म्हटल्यावर उरलेले तिकडे धावले.

एकाला विचारले, का रे बाबा हे आणलेस? तर त्याला उत्तर देता आले नाही. (मी चव पाहिली थोडी आंबट तुरट तिखट अशी मिश्र चव होती) मला ब्राह्मणाची गोष्ट आठवली, स्नानासाठी नदीत उतरताना त्याने पळीभांडे ठेवले तिथे एक पिंडी रचून, त्यात ते लपविले होते. तो ब्राह्मण स्नान करून बाहेर आला तर पात्राच्या वाळवंटात वाळूच्या पिंडीच पिंडी दिसल्या. नंतर आलेल्या प्रत्येकाने पहिली पिंडी पाहिली व या तीर्थाची ही प्रथा असावी असे समजून वाळूची पिंडी तयार केली व स्नानास गेला.

आज ३५० हून अधिक जण, कदाचित ५०० ही असतील, कदाचित त्याहूनही अधिक, कारण एवढी मोठी धर्मशाळा पूर्ण भरली होती. ओसरी, विशाल आंगण, गच्ची......सर्व ठिकणी परिक्रमावासी होते.

नावेजवळ इतके निसरडे होते की विचारू नका. बाहेरून नाव धरून केवट होता, परंतु चढणाऱ्यांमुळे नाव पाण्यात दूर सरकत होती. मी गळ्यातील पिशवी टाकली पण सॅक उचलून आत टाकणे जमतच नव्हते. ती पूर्ण उचलून धरली तरी कडेला अडकून आत जातच नव्हती, त्यातून एकदा मी धडपडीत पाण्यात जवळजवळ पडलोच. अखेर नावेत स्थानापत्र होण्यात यश मिळावे.

स्लीपिंग बॅग किन्तानात भरून घेतली म्हणून वाचली. सॅक मात्र चिखलाच्या पायाखाली तुडवून निघावी मी स्वतः टोकाला नांगराजवळ चिखलातच बसलो होतो कारण नांगर, त्याची कडी, दोर, सारे काही चिखलाने माखलेले होते.

नावेत बसलेल्यांची तोंडे मिठीतलाईकडे होती त्यांना सरळ ऊन लागत होते. माझे तोंड कठपोरकडे होते. मला कमी त्रास झाला.

नावा निघाल्या तेव्हा तासभर गढूळ पाणी होते. पाण्याच्या पृष्ठभागावर नंतर चटईसारखे आडवे उभे डिझाझ दिसू लागले. दीड-दोन तासांनी गढूळ पाणी जास्त स्वच्छ पाणी दिसू लागले. मोठया सतरंज्यांची जाड आडवी वीण दिसावी तशी नक्षी आता पण्यावर दिसत होती.

उजवीकडला (दक्षिण) किनारा हळूहळू लुप्त झाला व डावी बाजू आणि माझ्या मागची म्हणजे मिठीतलाईकडील बाजूकडे सीमाविहित अथांग पाणी दिसू लागले. उजवीकडील कड अजून दिसत होती.

मध्येच एक फुलपाखरू दिसले. हे इतके आत कसे आले आणि आता परतायला याच्या पंखात ताकद असेल का असा विचार येऊन गेला.

कठपोर सोडून नावा निघाल्या तेव्हा डाव्या-उजव्या किनाऱ्याजवळ चिखल पाण्यात मोठे काळे बगळ्यासारखे पक्षी दिसले. आकाशातून येऊन सीगल दिमाखाने पाण्यावर उतरून मजेने तरंगताना एका ठिकाणी दिसले.

समुद्र शांत असल्याने नावा शांतपणे मार्गक्रमण करत होत्या. जवळपास तीन-साडेतीन तासांनी संगमाची जागा आली. तत्पूर्वी केवट बांबू टाकून पाण्याची खोली तपासत होता. नाव चालताना तळाचा चिखल, रेती पुंजक्या पुंजक्याने पाण्यावर यायची. पाण्याची खोली खूप नसावी असे त्यावरून वाटत होते.

संगमावर नावाड्याने नारळ आणि कुपी भरणे ही दोन्ही कामे केली, त्याबद्दल ऐच्छिक दाम प्रवाशांनी दिले.

तुम्ही किती उंच झेप घ्याल हे तुमची पाळंमुळं किती खोलवर रुजलेली आहेत यावर अवलंबून असतं.

११। ते ३.३० असा प्रवास करुन आम्ही सुखरूप वाळूवर उतरून किनारा गाठला व मिठीतलाईतीन आश्रमात मुक्काम केला.

**दिवस २८ वा - मिठीतलाई-केसरोल**
**सकाळी ५।। ते संध्याकाळी ५।। (२५ कि.मी.)**

आजपासून वाटचाल उत्तर तट, पश्चिमेकडून पूर्वेकडे - सागरसंगमापासून नर्मदामैय्याच्या उगमाकडे ह्न मिठीतलाईपासून अमरकंटकाकडे.

सूर्य आता उजव्या हाताला तोंडासमोर उगवतो आणि मावळतीला उजव्या हाताला आमच्या मागे मावळतो.

आता 'नर्मदा हर' चा गजर होताना दिसत नाही. पोर्ट ट्रस्टप्रमाणे फार मोठा भाग बंदिस्त केलेला आहे. एकूण विकासाचे मोठे कार्य सुरू आहे. केवळ तेलाच्या एका उपलब्धतेने फार मोठी औद्योगिक नगरी इथे आकाराला येतेय. मोठे मोठे रस्ते हे इथले वैशिष्ट्य. तो भाग सोडला की दोन्ही बाजूला केवळ बाभळी, बाभळी आणि बाभळीच! सर्व प्रदेश उजाड, वैराण. २०-एक किलोमीटर गेलयावर थोडी शेती दिसायला लागली.

खूप आणि छान वारा आणि तपमान कमी असल्याने असूनही उन्हाचा त्रास झाला नाही. आजूबाजूला अजिबात म्हणजे अजिबात एकही वृक्ष नसल्याने सावली नाहीच नाही, तरीही दीड वाजेपर्यंत आम्ही सुखाने चाललो.

एका चांगल्या ठिकाणी जेवलो. त्यानंतर मात्र ऊन जाणवायला लागले. नाहीतरी जेवणानंतर आम्ही ढेपाळतोच. जेवण झाले की ५/१० मिनिटांत आम्ही सॅक उचलतो आणि मार्गस्थ होतो.

वाटेत टायरह्नट्यूब (ट्रक चाकातील टायरच्या आतलीचा तुकडा मिळाला) त्याचे बुटासाठी इनर (सोल) केले. मोच्याकडून देढियापाऱ्याला घेतलेले इतर टिकले नाहीत म्हणून हा उपद्व्याप. रबर सापडल्यावर एका पंक्चर रिपेअरवाल्याकडून कात्री घेतली व इनर केले.

काही वेळाने आणि एक रबर मिळाला तेवहा माझ्यासाठीही दोन इनर चाकूच्या साहाय्याने तयार केले. भडोचकडे जाणारा हायवे खूप रुंद आहे आणि मधल्या भागात दोन्ही रस्ते विभागणारा रुंद बांधीव पट्टा आहे. त्या पट्ट्यात एक मंदिर होते, त्याच्या आवारात शेडखाली बसून आमचा हा उद्योग सुरू होता. तेवढ्यात तिथे एक रिक्षावाला आला व बसला. अंकलेश्वरहून तो इथे भाडे सोडायला आला होता. मोठ्या उत्साहाने त्यानेसुद्धा या 'प्रोजेक्ट'मध्ये सक्रिय भाग घेतला.

आणि दोघे-तिघे आले (समोरच आतमध्ये गाव आहे). कुणीतरी तीन केळी प्रसाद म्हणून आम्हांला दिली. केळी कुठून आणली, आम्हांला का देताय असे विचारल्यावर केळी आणली नाहीत, मूर्तीसमोर मंदिरातच ठेवलेली होती ती मी फक्त तुम्हांला दिली, इति!

तीनचे हे एक रहस्यच होऊन बसले आहे. केसरोद गावात तयार भोजन/चहा काही मिळत नाही, मिळणार नाही परंतु यासाठी लागणाऱ्या सर्व वस्तू सदावर्त म्हणून किंवा विकत मिळतील, पण तुम्हांलाच स्वयंपाक करावा लागेल असे गावकऱ्यांनी परखड सांगितले.

एक लिटर दूध आणि बिस्किटे विकत आणून क्षुधाशांती केली. (गावात छपरावर एक सुंदर मोर पाहिला)

दुपारी चहा घेतला तर त्याचे पैसे दुसऱ्या कुणी दिले होते. संध्याकाळी चहा घेतला तर स्टॉलवाल्याने पैसे स्वतःच घेतले नाहीत.

नर्मदे हर!

मी थाळी आणली नव्हती. दुकान दिसल्यावर एक घेतली ५० रु ची, मुद्दत भावात ४० रु.ला मारवाड्याने दिलेली. आतापर्यंत असे होई की भोजनासाठी स्वतःची ताटे काढायला सांगितली की अशोक-मंगल यांना एकाच

ताटात जेवायला लागायचे कारण दुसरे ताट मला दिलेले असे.

HDFC ATM मध्ये कार्ड नावासकर कॅश किती हवी इ. चौकशी करून PIN नंबर चुकीचा सांगून पैसे मिळाले नाहीत.

**दिवस २९ वा - केसरोल कुकुरवाडा १७ कि.मी. सकाळी ६। ते सायं. ५.३०**

राजघाट सोडलयापासून मैय्याचे दर्शन नाही. आता भडोचकडे हायवेने निघालो होतो. मिठीतलाई नंतर किनाऱ्याने जावे तर अनेक कंपन्या आल्याने वाटा बंद होतात.

हायवेवर ऊन लागते कारण रस्ते बोडके आहेत वाहनांची वर्दळ आणि सुसाट वेग यामुळे एकामागे एक असे चालावे लागते. छोट्या गाड्यांपेक्षा मालवाहतुकीचे ट्रक सतत असतात. जागोजाग काचांचा चुरा दिसतो. या साऱ्या अपघाताच्या खुणा असतात.

आज भरूचला पोहोचू या हिशेबाने निघालो. दहा कि.मी. चालल्यावर इस्माइल नावाच्या माणसाने नर्मदेकडे जायचा रस्ता सांगितला व किनाऱ्याजवळून पुढे जाता येते हे सांगितले. त्यामुळे आम्ही, फळे मिळाली ती खाऊन, ११॥ वाजता आत गावाकडे वळलो. खूप आनंद झाला. आजूबाजूला झाडांची सावली लपंडाव खेळत होती. वस्तीच्या खुणा दिसायला लागल्यावर चैतन्य भरले व 'दशन' गावात आम्ही शिरलो, आश्रमाजवळ जाता जाताच नर्मदेच्या प्रसन्न प्रवाहाचे दर्शन झाले आणि मी गद्‌गद्‌ झालो. कितीतरी दिवसांनी मला मैया सापडली होती.

जोशी या आश्रमाप्रमुखाने तयार खिचडी व भाजी देण्याची तयारी दाखविली.

आम्ही नदीवर जाऊन स्नान केले व नवचैतन्याचा पुन्हा अनुभव घेतला.

नदीजवळून वाटेने मार्ग कापताना खूप खूप आनंद वाटत होता. भरपूर झाडे होती. ज्वारी/बाजरीची कणसे आलेली शेते लागली. कापूस दिसला, भरपूर तुरी शेंगावर आलेल्या दिसल्या. वांगी तर खूप बहरली होती. कसलेले वेल मांडवावर चढलेले होते आणि फुलावर/शेंगावर आलेली शेवग्याची झाडे भरभरून होती.



गेले कित्येक दिवस या आनंदाला मी मुकलो होतो. चिंचेची झाडे तर मी विसरूनच गेलो होतो. ती दिसली.

संध्याकाळी भडोचपासून ५ किमीवर श्री लोकेशानंद मठात मुक्काम केला.

आमचे छान स्वागत झाले. लोकेशानंदांनी समोर बसून आस्थेने विचारपूस केली. चहा दिला. रात्री रोटी व भाजीही मिळाली.

श्री लोकेशानंदजींबद्दल माझे फार चांगले मत झाले. माणूस कर्तृत्ववान, तेजस्वी, प्रेमळ आणि विनम्र आहे. गेली ११॥ वर्षे ते इथे आहेत.

आज हे जे नंदनवन दिसतेय तिथे महाराज येण्यापूर्वी फक्त एक छोटी कुटी/मंदिर होते.

क्रमशः

**श्री. अरविंद ओक**
मानपाडा, डोंबिवली.
भ्रमणध्वनी : ०९८३३४४१५८०

●●●

'कर्तव्यदक्षता' हा असा गुण आहे, जो तुम्हांला कायम दाखवावा लागतो.

# विकासवेध-२ : कोकण रूळमार्ग

*कोकण रूळमार्गाची निर्मिती आणि त्यामुळे साधलेला विकास यांचा आढावा लेखकाने या लेखात घेतलेला आहे - संपादक*

जुलै महिन्याचा पहिला सप्ताह. आकाश काळ्याकुट्ट ढगांनी भरून आलेले. सकाळी कामाला जाण्याची घाई. फलाटाच्या कडेवर स्थानिक-रूळगाडीच्या प्रतीक्षेत टाचा उंचावून, येणाऱ्या गाडीचा वेध घेत असणारे शेकडो स्त्री-पुरुष. अचानकच सोसाट्याच्या वाऱ्यासह सुरू झालेला जोराचा पाऊस. गाडी फलाटास लागते. उतरणाऱ्यांची-चढणाऱ्यांची एकच झुंबड उडते. फलाटाचे छत आणि गाडीची दारे ह्यांच्यातील उण्यापुऱ्या फुटा-दीड फुटाच्या फटीतून पाऊस पाणी ओतत असतो. छत्र्या प्रत्येकापाशीच असतात, मात्र त्या उघडायला संधीच मिळत नाही. चाळीस सेकंदांच्या थांब्यात, नवी माणसे पोटात घेऊन गाडी पुन्हा सुरू होते. सगळी माणसे नखशिखांत भिजलेली. ती पुढे दिवसभर तसेच कपडे सुकवत राहणार असतात.

मग मला दिवसाचे एक स्वप्न दिसू लागते. ह्या पहिल्या फलाटापासून, तर त्या बाजूच्या अखेरच्या फलाटास कवेत घेणारे, संपूर्ण स्थानकावर एकमुस्त छत असते, तर कदाचित ही सगळी माणसे कोरडी राहू शकली असती. कधी होईल का हो हे स्वप्न साकार?

मुंबईपासून केरळात आणि केरळातून मुंबईस येणा-जाणारा माल दीर्घकाळ महामार्गांवरच वास्तव्य करतो. जेवढा दूरचा प्रवास तेवढाच त्याला लागणारा वेळ जास्त. दिवस-दिवस तर नुसत्या प्रवासासच लागतो. मग मालाचा चढ-उतार करण्यास लागणारा आणि प्रशासकीय विलंबाचा काळ निराळाच. नाशवंत खाद्यपदार्थांना ह्या विलंबामुळे पोहोचणारी हानी अपरिमित असते. नुकसान होते. रस्त्यांवरच्या प्रवासास रूळमार्गांवरील प्रवासाच्या मानाने अधिक काळ लागतो. रूळमार्गांवरील प्रवास गतिमान. मात्र त्याकरता मालाचा चढ-उतार करण्यास लागणारा आणि प्रशासकीय विलंबाचा काळ खूपच जास्त पडतो, असा अनुभव आहे.

ह्या दोन्ही प्रवासपद्धतींतील चांगल्या बाजूंची बेरीज कधी करता येईल का हो? म्हणजे असे समजा की, व्यापारी आपापल्या कारखान्यांतच मालाची चढ-उतार करतील. मग मालवाहक वाहने आणून, रूळमार्गांवरील मालगाड्यांवर आणून उभी करतील. रूळमार्गांवर त्यांची जलद, गतिमान वाहतूक होऊन तो माल दूरस्थ स्थानकांवर आणला जाईल. त्यानंतर पुन्हा व्यापारी आपापली वाहने वाघिणींवरून पाय-उतार करून व्यापारी आस्थापनांवर रस्त्यांवरून चालवत नेतील. असे केल्यास चढ-उतार आणि प्रत्यक्ष प्रवासास लागणारा कालावधी अर्ध्याहून कमी होऊ शकेल. कधी होईल का हो हे स्वप्न साकार?

अशी छोटी छोटी स्वप्ने एक दिवस खरोखरीच साकार झाली. कोकण रूळमार्ग सुरू झाला. मधू दंडवते, जॉर्ज फर्नांडिस ह्यांसारख्या रूळमार्ग-मंत्र्यांची सुरेख स्वप्ने प्रत्यक्षात आली. २६ जानेवारी २०१४ रोजी, कोकणची जीवनरेखा असलेला कोकण रूळमार्ग सोळा वर्षांचा झाला. वयात आला. भारतीय उपखंडातील विकासाच्या इतिहासात उत्तुंग दीपस्तंभ बनून राहिलेल्या कोकण रूळमार्गाचा आज आपणां सगळ्यांनाच सार्थ अभिमान आहे.

आज वाशी स्थानकाकडे देशातल्या आदर्श स्थानकाचा नमुना म्हणून पाहिले जाते. गाड्या, फलाट, इमारत, रूळमार्ग पार करणारे दादरे, सगळेच एका

दुःखाला नसता भाव दिला नाही, की मग सुखाचा अभाव कधी जाणवतच नाही.

छताखाली आणल्याने, स्थानक आहे की विमानतळ असे वाटवणारे भारतातले पहिले रूळमार्ग स्थानक आहे वाशी.




**इन्टरनॅशनल इन्फोटेक पार्क? छे! हे तर आहे कोकण रूळमार्गावरचे विश्वविख्यात वाशी स्थानक.**

भारतभरच्या स्थानकांभोवतीच्या बकाल वस्तीचा येथे निकास करून, आंतरराष्ट्रीय-माहिती-तंत्रालयाची (इन्टरनॅशनल इन्फोटेक पार्कची) निर्मिती स्थानकाच्या छतावरच केल्याने साऱ्या परिसराचेच उद्धरण केलेले स्पष्टपणे जाणवते. कोकण रूळमार्ग प्रकल्पाला अशी विकासाची दिव्य दृष्टी देणारे ई. श्रीधरन मात्र आज आपल्यात नाहीत.

कोकण रूळमार्ग हा भारताची व्यापारी राजधानी असलेल्या मुंबईपासून तर मंगलोरपर्यंत, कोकणातून, सह्याद्री पर्वत व अरबी समुद्र ह्यांमधील अरुंद डोंगर-उतारांवरून धावणारा ७४१ कि.मी. लांबीचा रूळमार्ग आहे. महाराष्ट्र, गोवा व कर्नाटक राज्यांतून तो मार्गक्रमण करतो. वाटेत आडव्या येणाऱ्या पश्चिमवाहिनी नद्या आहेत, खोल खोल दऱ्या आहेत आणि आकाशाला भिडणाऱ्या सह्य-पर्वतराशीही आहेत. त्यांना बोगदे करून त्यांतून रूळ घालत, हिरवीगार किनारपट्टी आणि खनिजसंपन्न जमिनींतून हा मार्ग धावतो. १९ जुलै १९९० रोजी कोकण-रूळमार्ग-महामंडळाचा जन्म झाला. २० मार्च १९९३ रोजी उडिपी आणि मंगलोर दरम्यान पहिली प्रवासी वाहतूक सुरू झाली. २६ जानेवारी १९९८ रोजी कोकण रूळमार्गाने पूर्ण क्षमतेने प्रवासी व मालवाहतुकीस सुरूवात केली. १९९८ मध्येच कोलाड ते सुरतकल सवार-उतार-सेवा (रोल-ऑन, रोल-ऑफ उर्फ रो-रो सर्व्हिस) ही सुरू झाली. तेव्हापासून कोकण रूळमार्ग दरसाल २२,००० हून अधिक मालवाहू वाहनांची वाहतूक रूळमार्गावरून करत आहे. ह्या वाहतुकीमुळे महामार्ग अवजड सामानांच्या वाहतुकीतून मुक्त झाले. वाहतूक अवरुद्धतेचे (ट्रॅफिक जॅम्सचे) प्रमाण घटले. मालवाहतुकीस लागणारा कालावधी, किंमत आणि भांडवली गुंतवणूक ह्यांत मोठीच बचत होऊ लागली.



**सवार-उतार-सेवा**
**(रोल-ऑन, रोल-ऑफ उर्फ रो-रो सर्व्हिस)**

कोकण रूळमार्ग आज भारताच्या शिरपेचातील देदीप्यमान तुराच झालेला आहे. भारतीय अभियंत्यांच्या कर्तृत्वाचे दिमाखदार प्रतीक झालेला आहे. प्रवाशांना तर तो एक मोठेच वरदान ठरला आहे. आजवर सुरू झालेल्या आणि नित्यनवीन सुरू होणाऱ्या कोकण रूळमार्गावरील प्रत्येक गाडीचे आरक्षण, तासा-दोन तासांतच पूर्ण भरून प्रतीक्षायादी वाढू लागते आहे. त्यामुळे कोकण रूळमार्ग घातल्याने विकास खरोखरीच साधला आहे. मात्र तो पुरेसा नाही.

(पुढील पृष्ठ क्र....२३ वर)

# भारतीय संस्कृती - बीज, मॉडेल व साधना

*श्री. साने यांच्या विचारपरिपूर्ण लेखमालिकेतील हा पुढील लेख - संपादक*


**प्रास्ताविक**



**महायोगी अरविंद घोष (पाँडीचरी)**

महायोगी अरविंद घोष हे जेव्हा अलिपूर जेलमध्ये बंदिस्त होते तेव्हा त्यांना 'वासुदेव' दर्शन झाले. हा काळ होता मे १९०८ साल, बंगाल प्रांतात!!

**वासुदेव दर्शन**




मला प्रश्न पडला होता की हे 'वासुदेव दर्शन' म्हणजे नक्की काय? अरविंद काही सामान्य माणूस नव्हते. इंग्लंडमध्ये I.C.S. परीक्षा पास झाले होते, पण ब्रिटिशांची नोकरी करावयाची नाही, हे ठरविल्यामुळे 'घोड्यावरती बसण्याची व रपेटण्याची परीक्षा' देण्याचे त्यांनी मुद्दाम नाकारले होते. त्यामुळे हे 'दर्शन' हा काही बुवाबाजीचा प्रकार नसणार, तर मग नक्की काय, हा विचार मी मनात बाळगला होता. ह्याच्या शोधात मी होतो !!

**महायोगी अरविंदांचे मार्गदर्शन**

अरविंदांच्या पुढच्या योग संशोधनामध्ये त्यांनी "Essays on The Gita" 'गीतेवरचे निबंध' व "Synthesis of Yoga" व "Life Divine" ही पुस्तके लिहिली. त्यामुळे ह्या 'वासुदेव' संकल्पनेचा अभ्यास भगवद्गीतेतील वासुदेव ज्ञानाने होईल असे लक्षात आले.

गीतेच्या १८ व्या अध्यायामध्ये ७४ व्या श्लोकात काय उल्लेख आहे. संजय उवाच :

इत्यहं वासुदेवस्य पार्थस्य च महामानः
संवादमिमम श्रौपमद्भुतं रोमहर्षणम् ॥

लोकमान्य टिळकांच्या भाषांतराप्रमाणे ह्याचा अर्थ असा : संजय म्हणाला - ''याप्रमाणे अंगावर रोमांच उभे करणारा 'वासुदेव' व महात्मा अर्जुन यांचा हा अद्भुत संवाद मी ऐकाला.

पुढे संजय म्हणतो (७५ श्लोक) ''व्यासांच्या अनुग्रहामुळे हे परम गुह्य म्हणजे अर्थात कर्मयोग साक्षात योगेश्वर श्रीकृष्ण स्वतः सांगत असता मला ऐकावयास मिळाला.''

पुढे लो. टिळक म्हणतात की 'योग' शब्दाचा अर्थ व्यापक आहे. परमेश्वर मुळात अव्यक्त असता तो ज्या युक्तीने स्वतःलाच व्यक्त स्वरूप देतो, ती युक्ती किंवा योग सर्वांत श्रेष्ठ होय असे म्हणावे लागते. गीतेत यालाच 'ईश्वरी योग' असे म्हटले आहे. (गी.अ.श्लो.९.५; ११.८)

थोडक्यात जेव्हा मनुष्याची पंचेंद्रिये कार्य करतात व जेव्हा तो झोपतो, जागा होतो तेव्हा त्याला वाटते की तो कुठलाही 'योग' करत नाही व हे सर्व 'यांत्रिकपणे' होते आहे.

८ व्या अध्यायात अकराव्या श्लोकात श्रीकृष्ण असे म्हणतात की 'जीवात्मा' हा योग मुमुक्षू साधकाकरता माझ्याकडूनच करविला जातो. हाच मथितार्थ आठव्या अध्यायात ११ व्या श्लोकात हा (साधक) ॐ ब्रह्मात प्रवेश करून ('अजाणता') हा 'ईश्वरी योग' करत असतो.

यापुढे गीता तपासतांना अध्याय ७ वा मधील श्लोक १८ व १९ कडे लक्ष वेधणे जरुरीचे आहे. पण त्यावरील अरविंदांचे भाष्य जास्त प्रकाश टाकते.

(18) "Noble are those without exception (भक्तगण) but the knower is verily my self, for as his highest goal he accepts Me, the 'Purushottam (पुरुषोत्तम) with whom he is in union.

मग 'वासुदेव' कुठे व कुठल्या स्थानावरील संकल्पना?

(19) At the end of many births the man of Knowledge attains to Me, very rare is the great soul who knows that Vasudeva (वासुदेव) the omnipresent Being, is all that is."

अजूनही 'वासुदेव' व 'पुरुषोत्तम' ह्या संकल्पना स्पष्ट जाणवणे आवश्यक आहे. त्यावर अरविंद म्हणतातः-

"And this Knower says the Godhead in the Gita, is my self, the others seizs only motives and aspects of Nature, but he the very self being and all-being of the Purushottam (पुरुषोत्तम) with which he is in union, his is the Divine birth in the supreme Nature, the Integral is being, completed in will, absolute in love, perfected in Knowledge."

"In him the Jiva's cosmic existence is justified, because it has exceded itself and so found its own whole and highest truth of being."

**अवतारपुरुष श्रीकृष्ण**



**पुरुषोत्तम - विश्वरुप दर्शन**

द्वापार युगात श्रीकृष्ण हा देवाचा अवतार आहे हे सर्वसमान्यांना माहीत असते. प्रत्यक्ष देव किंवा परमात्मा हा एक मनुष्यदेह होऊन मानवी सृष्टीचा उद्धार करण्याचे कार्य करत असतो. मग त्याची निरनिराळी नावे महाभारतात, अध्यात्मविद्येत, भक्तिसाधनेत किंवा योग साधनेत येतात, ती का ?

ह्याचे उत्तर आपल्या भौतिक जीवनात आपणही आपल्या मित्राला अनेक नावांनी त्याला संबोधत असतो, ते कां? त्याचे कारण उघड आहे. त्या मित्राच्या घरात त्याला 'नानासाहेब' म्हणतात ते त्याच्या गृहस्थाश्रमातले व कौटुंबिक समूहातील नाव ! त्यांच्या इतर नावांचाही म्हणजे डॉक्टर, प्रोफेसर, संस्थेचा अध्यक्ष वगैरेनी ओळख करवतो.

'वासुदेव' व 'पुरुषोत्तम' ह्या दोन संकल्पना व 'नारायण' ही नामावली त्या त्या संदर्भाने जाणतो, होय ना!



विराट यज्ञ (Consciousness Adventure)

मग अध्यात्मसाधनेच्या संदर्भात ह्या जाणल्या पाहिजेत!! भगवद्गीतेत - विश्वरूपदर्शनाचे वर्णन आहे त्या ११ व्या अध्यायात - ब्रह्मविद्येचे विवेचन आहे त्या संदर्भात 'श्रीकृष्ण' हे स्वतःला 'पुरुषोत्तम' म्हणून वर्णन करतात. खुद्द भगवद्गीतेच्यासंदर्भात व संहितेत 'भगवान उवाच' म्हणजे 'भगवान म्हणाले' हा संदर्भ येतो जो म्हणजे खुद व्यास ऋणी, श्रीकृष्णाचे वचन हे त्याच्या प्रत्यक्ष मुखांतून आले जे जसेच्या तसे व तेवढ्या शुद्ध वचनामध्ये सांगत आहेत असे आपल्याला कथन करत असतात हे जाणले पाहिजे!!

पण ह्यापुढेही 'अध्यात्मशास्त्रात' म्हणजे 'Spiritual Science' ह्या शास्त्रात ह्या नावांना आणखी एक संदर्भ आहे.

### संध्या व आचमन क्रिया

आपण संध्येमध्ये विष्णूच्या २४ नावांचा जप वा आवाहन किंवा उपचार करतो जो एका विशिष्ट अर्थाने करतो. जसे 'नानासाहेब' ह्यांचे शिक्षण हे 'डॉक्टर' ह्या पदवीपर्यंत झाले याचा अर्थ त्यांना 'Medical Knowledges' चे ज्ञान डॉक्टर ह्या पदवीपर्यंत झाले आहे. त्यामुळे त्यांना त्या शास्त्रातील ज्ञानाचा अधिकाराचा उल्लेख करून बोलण्यापेक्षा 'डॉक्टर', तुम्ही मला 'औषध'



गीता उपदेश

द्या किंवा 'इंजेक्शन' द्या असे सांगतो आणि ते 'सर्जन' असले तर 'आपले शरीर त्यांच्या हवाली करून ऑपरेशन' करण्याची विनंती करतो. तेव्हा ज्या विश्वासाने हा संवाद व्यवहार होतो तिथे तुमच्या जिवाशी, प्राणाशी त्याचा संदर्भ असतो, नव्हे का?

तेव्हा माणसाच्या संबोधनातून जसे त्याच्या 'ज्ञानाचा' व 'अधिकाराचा', 'सामर्थ्याचा','विश्वासाचा' संदर्भ आपोआप दर्शविला जातो, तसे 'आध्यात्मिक शास्त्रात' माणसाच्या 'आध्यात्मिक अधिकाराचाही' संदर्भ दिला जातो. त्यामुळे 'ऋषी', महात्मा, मुनी, आचार्य, संन्यासी वगैरे नावे उचारण्याची पद्धत आहे. स्वामी व श्री १०८ महाराज, 'महर्षी, 'परमहंस' वगैरे नावांचा हा अर्थ आहे.

पण इंग्रजी संस्कृतीमध्ये ह्या अधिकाराचा वा पायरीचा संदर्भ 'Consciousness' ने जाणला जातो. त्यामुळे प्राणी वा वनस्पती ह्या योनींना जी पातळी आहे ती अनुक्रमे 'Animal Consciousness' व 'Plant Consciousness' अशी म्हणता येते.

मग सामान्य माणसाची 'Human Consciousness' ह्या संज्ञेने जाणता येईल, पण पुढे त्याची अध्यात्मशास्त्रात होऊ जशी प्रगती शकेल तसतसे त्याला 'Body

Consciousness', 'Soul Consciousness' व शेवटी 'Divine Consciousness' अशा पदव्या लाभतील.

पण कौतुकाची गोष्ट म्हणजे संध्येमध्ये जी २४ नावे विष्णूची घेतली जातात ती म्हणजे केशवाय नमः, माधवाय नमः, नारायणाय नमः वगैरे वगैरे ही त्या अवताराची 'Consciousness' पातळी ह्या अर्थाने घेतली जातात किंवा त्या २४ पायऱ्या ह्या 'Evolutrovery Consciousness' मधील सोपान पायऱ्या होत असे म्हटले जाते.

ह्या नावांत ''वासुदेवाय नमः'' हे १४ वे स्थान आहे. मग ह्याचा अर्थ काय? तर त्याचा अर्थ हठयोग, राजयोग यशस्वीपणे करून व इतरही योग पद्धतीमध्ये प्रगती करून 'दिव्य शरीर' ह्या भौतिक जगातील साधनाने त्याने एक पातळी गाठली किंवा कमावली असा त्याचा अर्थ होतो. ह्या पातळीपुढे ही 'शरीर, मन (भौतिक पातळी) ची 'Embodied Consciousness' यंत्रणा पुरी पडत नाही, असा दावा केला जातो. ह्या भौतिक यंत्रणेचा उच्चांक 'Body Consciousness' चा हा उच्चांक, उंबरठा आहे असे मानावयाला लागते!!

### विश्वरूप दर्शन व पुरुषोत्तम

त्यानंतरच्या पायऱ्या 'भगवद्‌गीतेत' जरी सापडल्या नाहीत, तरी त्या 'गीतेत' श्रीकृष्ण जो 'पुरुषोत्तम' ह्या संज्ञेचा उल्लेख करतात ती सर्वोच्च पातळी ही 'Divine Consciousness' ची उंची आहे. गीतेतील अभ्यास हा 'अर्जुनाला' ह्या पातळीची उंची गाठण्यासाठी लय व साधना करावयाला उद्युक्त करतो व त्याचा परिचय वा त्या पातळीचे प्रत्यक्ष दर्शन ११ व्या अध्यायात सांगितलेल्या 'विश्वरूप दर्शन' ह्या प्रसंगातून दर्शविले आहे.

हे म्हणजे शिशुवर्गात असलेल्या 'हुशार व तरुण' (क्षत्रियाला) (लढवय्याला, साधकाला), P.H.D. किंवा डॉक्टरेट ह्या ज्ञानाच्या पातळीचा आगाऊ परिचय करून देणे व त्याचे फळ 'कैवल्यपद' किंवा 'सत्‌ चित्‌ आनंद' स्वरूप असे होऊ शकेल. आता हा 'गीता योग' फक्त 'वासुदेव वा तत्सम' पातळीपर्यंत शिक्षणाचा कार्यक्रम होय, असे आपण म्हणू शकू!! त्यापुढचा प्रगतीचा मार्ग हा महायोगी अरविंदांनी 'Synthesis of Yoga' ह्या ग्रंथात सविस्तरपणे वर्णिला आहे. पण नुसते वर्णन करून थांबता येणार नाही. कारण योगी अप्रबुद्ध म्हणतात त्याप्रमाणे -

"What is applied science to 'Pure Science' So it is 'Yoga' to Vedic knowledge" तसे हा वेदीक 'अध्यात्म अभ्यास' वा 'तप' होय हे प्रत्यक्ष पुढील योगसाधनांनी म्हणजे 'पुरूषोत्तम योग' किंवा 'Integral Yoga' ह्या मार्गाने करावा लागेल ह्याचे थोडक्यात वर्णन करावयाचे झाल्यास असे सांगावयास लागेल की हा योग राजयोग वा इतर अनेक योगमार्गात जी साधने आहेत त्यांच्या मर्यादांच्या बाहेर जाऊन त्या 'साधना' 'Instruments' ची शुद्धता करावी लागेल. त्याला महायोगी अरविंद हे 'Integral Transmutation of Instrumentation' असे संबोधतात.

हे सर्व आपण सावकाश पुढच्या काही लेखांत सांगणारच आहोत. पण, नुकतीच माझी कौपीनेश्वर मंदिर व मराठी ग्रंथ संग्रहालय, नौपाडा येथे भाषणे झाली त्या वेळेला 'वेळेच्या अभावामुळे' संपूर्ण कल्पना देता आली नाही. विषय होता 'Integral Yoga' (कौपनेश्वर) व Mind, Intalligence and Cosmic Inteligence" ह्या Pandht Atre L. N., F.I.C.A. लेखक ह्या Udveli Books (Shri. Mehetre Vivek) ह्यांच्या पुस्तकाच्या प्रकाशन समारंभाच्या भाषण प्रसंगी !!

ह्याचे उघड कारण असे आहे की माणसाचे शरीर, इंद्रिये, अंतःकरण, चित्त, बुद्धी, मन ह्या सर्वांना निरनिराळया भौतिक व अध्यात्मिक तपाच्या साधनेच्या जशा उन्नतीच्या, सात्त्विक्ता व 'पुरुष' ह्या Human Form of Earthly Life ह्यांच्या संधी आहेत व मर्यादा आहेत त्या जाणून व ओलांडून त्यांचे Eternal अनंतातील स्वरूप गाठावे लागणार आहे. त्या संकल्पनेची साधी

तोंडओळखसुद्धा आज मानवी मनाला नाही आहे. ही जाणणे व करणे आवश्यक आहे. तोपर्यंतचा काळ हा 'धडपडीचा व संशोधनाचा' आहे. ह्या Herculian प्रयत्नाच्या मागे समाजाने लागणे आवश्यक आहे.



**मामतुस्मर युद्धयच**

हा प्रवास जन्मजन्मांतरीचाही आहे. कारण ह्या भौतिक जीवनाच्या मर्त्यशरीर निद्रित जीवात्म्याच्या १०० वर्षांच्या किंवा आसपास, ह्या 'चैतन्ययुक्त' प्राण व 'शरीर' मर्यादेच्या काळाचा फायदा घेऊन काही प्रगती झाल्यास पुढील प्रवास यशस्वी होऊ शकेल. नाहीतर ह्या 'साखळी जीवन चक्रातच' पुन्हा पुन्हा Repeater ह्या पद्धतीचे जीवन जगावे लागणार आहे हे निश्चित !!

तेव्हा ह्या लेखापुरता हा संक्षिप्त व धावता परिचय देऊन व पुढील कार्यक्रमाचा संकल्प व आश्वासन देऊन, हा विषय इथे थांबवतो!!

॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥

**यशवंत साने**
सोनल अपार्टमेंट, सारस्वत बँकेशेजारी,
अग्यारी लेन, ठाणे ह्न ४०० ६०१
दूरध्वनी : २५३६ ८४५०
भ्रमणध्वनी : ९००४०५१८४७
E-mail : saneyr1@gmail.com

●●●

**सन यात सेन यांची समाधी....**

(मागील पृष्ठ क्र ४ वरून.... )

परंतु नॅनजिग येथील समधीची सर कशालाच येत नाही. समाधीच्या जवळ जाताच तिची भव्यता आपल्या नजरेत भरते. एका मोठ्या आकाराच्या दारातून आपण इमारतीत प्रवेश करतो. या दारावर चिनी भाषेत काहीतरी लिहिलेले आहे. ते काहीतरी महत्त्वाचे असावे म्हणून आम्ही वाटाड्याकडे चौकशी केली. त्याने त्या मजकुराचे भाषांतर करून आम्हांला सांगितले. त्या चार शब्दांचा अर्थ आकाशाच्या खाली जे काही आहे ते सगळ्यांचे आहे. याच तत्त्वाच्या आधारे तर त्यांनी कम्युनिस्ट राजवटीची स्थापना केली. सुरूवातीच्या काळात तिचे संगोपन केले. त्या पायावरच चीनचा एवढा डोलारा उभा आहे.

**डॉ. सुधाकर आगरकर**
सी-१४, विसावा, वैभव नगरी,
कल्याण-शीळ रोड, काटई, ता. कल्याण,
जि. ठाणे - ४२१२०४

●●●

**विकासवेध-२ : कोकण रूळमार्ग**

(मागील पृष्ठ क्र. १८ वरून.... )

अशीच तंत्रशास्त्रीय प्रगती करत राहिल्यास एक दिवस आरक्षणाच्या रांगा घटतील. मागेल त्याला रूळगाडीत प्रवेश मिळेल. अधिकृत प्रवाशाला हक्काची बैठक मिळेल. सुखाने प्रवास होईल आणि आपण सारेच विकासाची मधुर फळे आनंदाने आस्वादू लागू.

संदर्भः कोकण रेल्वे http://www.konkanrailway.com/

**नरेंद्र गोळे**
१०४ दत्तात्रय प्रसन्न, जोशीवाडी,
टिळकपथ छेदगल्ली, टिळकनगर,
डोंबिवली (पू.) -४२१२०१
भ्रमणध्वनी : ९९३०५०१३३५
Email : narendra.v.gole@gmail.com

# भारतीय संस्कृती व हिंदू धर्माची अमेरिकन विदुषी : डायना येक

*भारतीय संस्कृतीचा सखोल अभ्यास करून त्यावर विपुल लेखन करणाऱ्या अमेरिकन विदुषीची ही माहिती वाचकांना स्फूर्तिदायक ठरेल - संपादक*

अनेक भारतीय व विदेशी विद्वानांनी भारतीय संस्कृती व हिंदू धर्माचा अभ्यास विविध अंगांनी केलेला आहे. या क्षेत्रात योगदान दिलेल्या भारतीय विद्वानांपैकी श्री. महादेव जोशी, तर्कतीर्थ श्री. लक्ष्मणशास्त्री जोशी, श्री. रा.चिं.ढेरे, श्री. जे.कृष्णमूर्ती, श्री. श्रीकांत बहुलकर इत्यादी मंडळींचा आवर्जून उल्लेख करावा लागेल.

भारतीय संस्कृती व हिंदू धर्म हा अनेक विदेशी अभ्यासकांचादेखील आवडता व जिव्हाळ्याचा विषय राहिलेला आहे. अशा विदेशी अभ्यासकांपैकी डायना येक यांचे नाव आवर्जून नमूद करावे लागेल. डायना येक यांचा जन्म १९४५ साली झाला. त्या अमेरिकेतील हार्वर्ड विद्यापीठात 'कॅम्प्यारिटिव्ह रिलिजन व इंडियन स्टडीज्' (धर्माचा तौलनिक व भारतविषयक अभ्यास) या विषयाच्या तसेच लॉ ॲण्ड सायकियाट्री इन सोसायटी, (समाजविषयक कायदा व मानसशास्त्र) या विषयांच्या प्राध्यापिका आहेत. त्या 'डिपार्टमेंट ऑफ संस्कृत व इंडियन स्टडीजच्या (संस्कृत व भारतविषयक अभ्यास विभाग) देखील सदस्या आहेत. याव्यतिरिक्त त्यांचा इतर अनेक विभाग व अभ्याससंस्थांशी संबंध आहे व त्या सदर संस्थांच्या विविध संशोधन प्रकल्पांशी जोडलेल्या आहेत.

डायना येक यांनी रिलिजन (धर्म) या विषयात स्मिथ महाविद्यालयातून १९६७ साली पदवी प्राप्त केली व १९६८ साली लंडन विद्यापीठाच्या 'स्कूल ऑफ ओरिएन्टल ॲण्ड आफ्रिकन स्टडीज' (प्राच्य व आफ्रिकन अध्ययन विभाग) या विभागातून पदव्युत्तर पदवी घेतली. त्यांनी १९७६ साली अमेरिकेतील जगप्रसिद्ध हार्वर्ड विद्यापीठातून 'कम्प्यारिटिव्ह स्टडी ऑफ रिलिजन' (धर्मांचा तौलनिक अभ्यास) या विषयावर संशोधन करुन पी.एचडी. (विद्यावाचस्पती) प्राप्त केली.

प्राध्यापिका डायना येक यांचा वर नमूद केल्याप्रमाणे 'भारत' हा अभ्यासाचा व संशोधनाचा महत्त्वाचा विषय राहिलेला आहे. त्यांनी अनेकदा कित्येक दिवस व महिने भारतामध्ये राहून संस्कृतमधील मूळ संदर्भग्रंथ व इतर भाषांतील संदर्भअभ्यासून तसेच भारतीय पंडित व विद्वान आणि समाजातील सामान्य लोकांशीदेखील चर्चा करून अनेक विद्वत्तापूर्ण ग्रंथांची निर्मिती केली आहे. त्यांच्या संशोधनापासून व ग्रंथांपासून प्रेरणा घेऊन भारतीय तरुण संशोधकांनी त्याच तोडीचे संशोधन करण्याची गरज आहे. त्यांचे ग्रंथ वाचल्यानंतर ते निर्माण करण्यामागची मेहनत, अथक परिश्रम व भारताविषयीचा जिव्हाळा आपणांस जाणवतो.

डायना येक यांनी अनेक संशोधनप्रकल्पांवर काम करून ते यशस्वीपणे पूर्ण केले आहेत. तसेच त्यांनी अनेक ग्रंथांची निर्मिती केली आहे. त्यांपैकी खालील तीन ग्रंथ अतिशय महत्त्वाचे व रोचक आहेत असे म्हणणे वावगे न ठरावे. हे तीन ग्रंथ म्हणजे 'बनारसः सिटी ऑफ लाइट', 'एन्फाउंटरिंग गॉड : अ स्पिरिच्युअल जर्नी फ्रॉम बोझमन टू बनारस' व 'इंडिया अ सेक्रेड ज्यॉग्रफी' हे होत.

वर नमूद केलेल्या तीन ग्रंथांपैकी इंडिया अ सेक्रेड ज्यॉग्रफी या शीर्षकाचा मराठीत ढोबळ अनुवाद भारतातील पवित्र भूभाग / प्रदेश असा होईल. हे पुस्तक

दोन वर्षांपूर्वी म्हणजे २०१२ साली प्रसिद्ध झाले. या पुस्तकात लेखिकेने भारतातील हिंदू तीर्थकर व तीर्थयात्रांची रोचक अन् अभ्यासपूर्ण कथा (संशोधनाच्या अंगाने) सांगण्याचा प्रयत्न केला आहे. हे पुस्तक वाचताना आपणांस निर्भेळ आत्मानंद होतो यात शंकाच नाही.

भारत हा वैविध्यपूर्ण निसर्गाने नटलेला देश आहे हे आपण भारतीय जाणतोच. आपल्या देशात अनेक पर्वतरांगा, नद्या, जंगले असून तीन बाजूंनी सुंदर समुद्रकिनारा लाभलेला आहे. या प्रत्येक पर्वतरांगा, नद्या, जंगले व समुद्र किनाऱ्याशी आपल्या हिंदू धर्माचा जवळचा संबंध आहे. अनेक हिंदू पवित्र स्थळे व मंदिरे वर नमूद केलेल्या ठिकाणी संपूर्ण देशभर आढळतात. काही उदाहरणेच द्यायची झाली तर जम्मू-काश्मीरमध्ये वैष्णोदेवीचे मंदिर, अमरनाथचे शिवलिंग, उत्तरांचलमधील (उत्तराखंड) केदारनाथ, बदरीनाथ, गंगोत्री, रुद्रप्रयाग, उत्तर प्रदेशातील पवित्र गंगा नदी, राजस्थानातील अनेक मंदिरे, मध्य प्रदेशातील खजुराशेची प्रसिद्ध मंदिरे, गुजरातमधील सोमनाथ मंदिर, मध्य भारतातील पवित्र नर्मदा नदी, महाराष्ट्रातील अनेक ज्योतिर्लिंगे, कर्नाटक, केरळ, तामीळनाडू व आंध्र प्रदेशातील अनेक सुंदर मंदिरे, ओडिशातील प्रसिद्ध अशी पुरी व कोणार्कची मंदिरे इत्यादी उदाहरणे देता येतील. डायना येक यांनी आपल्या या ग्रंथात अशा अनेक पर्वतांची, नद्यांची, समुद्र किनाऱ्यांची व अनेक प्राचीन मंदिरांची चर्चा केली आहे. नव्हे, आपणांस एक पवित्र अशी धार्मिक सफर घडवून आणली आहे. भारतातील विविध प्रांतांमध्ये असलेली मंदिरे व पवित्र ठिकाणे, अशा स्थळांशी संबंधित असलेल्या प्राचीन कथा. या स्थळांचे हिंदूंच्या मनात असलेले महत्त्व व निस्सीम भक्ती त्याचप्रमाणे अनेक हिंदू परंपरा, धार्मिक विचार व त्यांचा भारतीयांवर असलेला पगडा या विविध बाबींचा संशोधनात्मक व विद्वत्तापूर्ण ऊहापोह करण्याचा यशस्वी प्रयत्न डायना येक यांनी केलेला आहे. या अभ्यासपूर्ण ग्रंथाचे वाचन केल्यानंतर आपल्या लक्षात येते की, अनेक शतके भारत या राष्ट्राची संकल्पना व भारतीयत्व तसेच एकसंध (अखंड) भारत हा हिंदू धर्म व भारताच्या विविध भागांतील असलेली हिंदू धर्माची तीर्थस्थळे यांमुळे राहिलेला आहे. याचे कारण म्हणजे दक्षिणेच्या अगदी टोकाकडे राहणारा भारतीय उत्तरेच्या अति टोकाकडील वैष्णोदेवी व अमरनाथ यात्रेसाठी जातो. उत्तरेच्या टोकाकडील भारतीय रामेश्वरम्, मदुराई व कन्याकुमारी या भारतातील अति दक्षिणेकडे असलेल्या पवित्र स्थळांना भेट देण्यासाठी येतो व ही प्रक्रिया आजपासून वा काही वर्षांपासून नव्हे तर हजारो वर्षांपासून म्हणजेच प्राचीन काळापासून सुरू आहे. त्यामुळेच भारताच्या विविध भागांवर कोणत्याही राजांचे, राजघराण्यांचे वा सत्तेचे राज्य असो; मूळ भारतीयत्वाची, ऐक्याची व अखंड भारताची संकल्पना नेहमीच भारतीयांच्या मनात तेवत राहिलेली आहे.

डायना येक यांनी 'इंडिया अ सेक्रेड ज्यॉग्रफी' या ग्रंथाची मांडणी अतिशय सुरेख केलेली आहे. सदर ग्रंथात एकूण दहा प्रकरणे असून या प्रकरणांत त्यांनी गंगा व इतर पवित्र नद्या, महादेवाची पूजा व त्याच्याशी संबंधित विविध गाथा व कथा, दुर्गामातेचे (शक्ती) माहात्म्य, विष्णूचे विविध अवतार, श्रीकृष्णाची भूमी व त्याची गाथा, रामायणाच्या पाऊलखुणा इत्यादींचा ऊहापोह केला आहे. या ग्रंथाची पृष्ठसंख्या ५५९ एवढी असून यावरून या ग्रंथनिर्मितीसाठी केलेले अथक परिश्रम व संशोधन यांची प्रचिती येते. तसेच हा ग्रंथ किती सखोलपणे लिहिलेला आहे हेदेखील जाणवते. इंग्रजीतील वाचकांना (सदर ग्रंथ इंग्रजी भाषेत लिहिलेला आहे.) काही संस्कृत शब्दांचा अर्थ कळावा तसेच अनेक भारतीय देवता व ऋषींची व पुराणांतील महत्त्वाच्या व्यक्तिमत्त्वांची व ग्रंथात नमूद केलेल्या विविध स्थळांची व ठिकाणांची माहिती मिळावी म्हणून 'ग्लोसरी' (पारिभाषिक शब्दकोश) देण्यात आली

परिपूर्ण काहीच नसते.

आहे. त्यामुळे वाचकाला हा ग्रंथ वाचताना व एखाद्या शब्दाचा अर्थ समजून घेताना कुठलीच समस्या वा अडचण येत नाही. त्यामुळे हा ग्रंथ अजून जास्त कळण्यासदेखील त्याचा उपयोग होतो. या ग्रंथाची निर्मिती करण्यासाठी लेखिकेने ३०० हून अधिक संदर्भग्रंथांचा वापर केला आहे. प्रत्येक प्रकरणातील विविध नावांची, ठिकाणांची व इतर महत्वाच्या गोष्टींची माहिती देण्यासाठी टिपा (Notes) दिल्या आहेत. या टिपांची संख्या ७५३ एवढी आहे. कुठल्याही विद्वत्तपूर्ण (परिपूर्ण) संशोधनग्रंथाचे वैशिष्ट्य म्हणजे सर्वांत शेवटी ग्रंथात उल्लेख केलेल्या नावांची, ठिकाणांची व इतर महत्त्वाच्या माहितीची वर्णानुक्रमाने अनुक्रमणिका दिली जाते व त्यात त्यांचा उल्लेख ग्रंथातील कोणत्या पृष्ठांवर आलेला आहे हे दर्शविलेले असते. जेणेकरून संशोधनकांना वा वाचकांना त्यांना हव्या असलेल्या विषयाची माहिती लगेच मिळू शकते.

डायना येक यांच्या संशोधनाची समाजाच्या अनेक स्तरांतून वाखाणणी झाली आहे. अमेरिकेत त्यांच्या लिखाणाची सर्वांत जास्त दखल घेतली गेली आहे. अमेरिकेतील अनेक अध्ययन व संशोधन संस्थांशी त्या निगडित आहेत. त्यांच्या संशोधनाची व प्रामुख्याने अमेरिकेतील धार्मिक चित्र कसे बदलत चालले आहे व धार्मिक विविधता कशी येऊ घातलेली असून त्यास अमेरिकन समाज कसा प्रतिसाद देत आहे हे सांगणाऱ्या 'प्ल्युरॅलिझम प्रोजेक्ट' या संशोधन प्रकल्पासाठी १९९८ साली अमेरिकेचे (अमेरिकेची संयुक्त संस्थाने) तत्कालीन अध्यक्ष बिल क्लिंटन यांच्या हस्ते नॅशनल ह्युम्यॅनिटीज मेडल हा बहुमान देण्यात आला आहे.

डायना येक यांचे संशोधन अशाच प्रकारे सुरू राहो व आम्हां वाचकांस त्याचा आस्वाद सतत घेता येवो अशी अपेक्षा......

**संदर्भसूची**

१) येक डायना : बनारस सिटी ऑफ लाइट
२) येक डायना : इंडिया अ सेक्रेड ज्यॉग्रफी
३) http://scholar.harvard.edu/dianaeck/home
४) www.pluralism.org/about/eck_cv.php

**-प्राध्यापक सुभाष गं. शिंदे**
उपप्राचार्य व इतिहासविभाग प्रमुख,
जोशी-बेडेकर महाविद्यालय, ठाणे.

**-प्राध्यापक नारायण सं. बारसे**
ग्रंथपाल, जोशी-बेडेकर महाविद्यालय, ठाणे.

●●●

**दिशासाठी**

**आपले लेखनसहकार्य अपेक्षित आहे. आपल्या अध्ययन-अध्यापन विषयांतील नवीन घडामोडी, नवीन ज्ञानक्षेत्रे यांबाबत सातत्याने लेखन करणे हे अध्यापनात साहाय्यकारी ठरणारे आहे.**

**तरी आपणांकडून लेखन अपेक्षित करीत आहोत.**

**- संपादक**

# स्कॉटलंडमधील ऐतिहासिक जनमत कौल

*स्कॉटलंडमध्ये नुकताच जनमताचा कौल घेण्यात आला. तेथील जनतेने युनायटेड किंगडममध्येच राहण्याचे मान्य केले. त्याची ही माहिती - संपादक*

१८ सप्टेंबर २०१४ हा दिवस युनायटेड किंगडम या देशाच्या इतिहासातील महत्त्वाचा दिवस ठरावा. या दिवशी सदर देशातील स्कॉटलंड या प्रांतात ऐतिहासिक असा जनमताचा कौल (Referendum) घेण्यात आला. यामागचे कारण म्हणजे गेल्या काही वर्षांपासून या प्रांतामध्ये स्वातंत्र्य मागणारा एक गट पुढे आला होता. अर्थात स्वातंत्र्य मागण्याचे प्रमुख कारण स्कॉटलंडच्या आर्थिक प्रगतीकडे युनायटेड किंगडमच्या केंद्रीय सरकारने केलेले दुर्लक्ष हे दिले जात होते.

जस-जसा जनमताच्या कौला चा दिवस जवळ येत होता, तस-तसा या देशातील प्रसारमाध्यमांचा पारा चढत चालला होता व अनेक अंदाज व्यक्त केले जात होते. अशा प्रकारच्या मतदानात जनतेला एक प्रश्न विचारला जातो व तिने आपले मत फक्त 'होय' किंवा 'नाही' असेच द्यावे लागते. वर नमूद केलेल्या दिवशी स्कॉटलंडमधील ५०% हून अधिक जनतेने युनायटेड किंगडमपासून स्वतंत्र होण्यास नकार दिला. या जनमत कौलात सुमारे ४२ लाखांहून अधिक जनतेने आपल्या मतदानाचा हक्क बजावला.

युनायटेड किंगडम हा वायव्य युरोपातील एक अनेक बेटांनी बनलेला देश आहे. याच्या उत्तरेस अटलांटिक महासागर, पश्चिमेस अटलांटिक महासागर व आयर्लंडचा समुद्र, पूर्वेला उत्तर समुद्र (नॉर्थ सी) तर दक्षिणेला इंग्लिश खाडी (चॅनेल) आहे. त्यामुळे हा देश मुख्य युरोपीय खंडापासून वेगळा आहे. या देशातील ईस्ट इंडिया कंपनी या व्यापारी कंपनीने इसवी सनाच्या अठराव्या शतकात प्लासीच्या लढाईपासून (१७५७) भारत काबीज करण्यास सुरुवात केली व इसवी सन १८५७ पर्यंत भारतातील अनेक राज्ये काबीज केली. इसवी सन १८५७ मधील उठावानंतर युनायटेड किंगडमच्या राणीचा व संसदेचा भारतावर अंमल सुरू झाला. त्यांनी भारतावर १४ ऑगस्ट १९४७ पर्यंत राज्य केले. त्यामुळे अनेक भारतीयांना या देशाविषयी अजूनही एक प्रकारचे आकर्षण आहे. युनायटेड किंगडम हे राष्ट्र इंग्लंड, वेल्स, उत्तर आयर्लंड व स्कॉटलंड या मोठ्या चार प्रांतांनी बनलेले असून याव्यतिरिक्त अनेक लहानसहान बेटांचादेखील समावेश आहे.

स्कॉटलंडच्या इतिहासाचा अभ्यास करता असे लक्षात येते की, त्यांचा इतिहास तसे पाहता फार किचकट आहे. इतिहासकारांच्या मते स्कॉटलंडमध्ये जवळजवळ ७००० वर्षांपूर्वी माणसे राहण्यासाठी आली असावीत व ती ब्रिटन आणि युरोपातील इतर भागांतून आलेली असावीत. तद्नंतर उत्तर आयर्लंड तसेच मुख्य युरोपखंडातून गॅलिक व सेल्टिक वंशाचे लोक तेथे जाऊन स्थायिक झाले. कालांतराने रोमन लोकांनी स्कॉटलंडवर हल्ला चढवला (इसवी सन ८०). रोमनांनी स्कॉटलंडमधील जनतेला पिक्टस् (Picts) असे संबोधले कारण ते आपले शरीर रंगाने रंगवीत असत. इसवी सन ५०० मध्ये उत्तर आयर्लंडमधून सेल्टिक वंशाचे स्वत:ला स्कॉट म्हणवणारे लोक स्कॉटलंडच्या पश्चिम किनाऱ्यावर आले व स्थायिक झाले. इ.स.वी. सन ८४३ मध्ये पहिला किनिथ मॅकअल्पिन हा स्कॉट लोकांचा राजा मूळच्या पिक्ट जनतेचाही राजा

झाला व त्याने पहिल्यांदा स्कॉटलंडचे एकत्रित राज्य प्रस्थापित केले. त्यानंतर स्कॉटलंडच्या गादीसाठी व राजेपदासाठी सतत संघर्ष झालेला दिसतो.

इसवी सनाच्या अठराव्या शतकाच्या सुरुवातीपर्यंत स्कॉटलंड व इंग्लंड हे स्वतंत्र देश होते व या दोन देशांमध्ये सतत धुसफूस चाललेली असे. इसवी सन १७०७ मध्ये स्कॉटलंडच्या व इंग्लंडच्या संसदांनी एकसंघाचा कायदा (अॅक्ट ऑफ युनियन) समंत केला आणि स्कॉटलंड व इंग्लंड एकत्र येऊन युनायटेड किंगडम ऑफ ग्रेट ब्रिटन हा देश अस्तित्वात आला. त्यालाच नंतर युनायटेड किंगडम असे संबोधले गेले.

इसवी सन १७०७ च्या या ऐतिहासिक घटनेनंतर इसवी सन १९९९ मध्ये एक महत्त्वाचा निर्णय झाला. तो निर्णय म्हणजे स्कॉटलंडसाठी स्वतंत्र संसदेची निर्मिती करण्यात आली. या संसदेची सदस्यसंख्या १२९ एवढी आहे. परंतु या संसदेला परराष्ट्र व्यवहार, संरक्षण, अर्थ, घटनेविषयक विधेयके, व्यापार इत्यादी महत्त्वाच्या विषयांसंबंधी कायदे करण्याचा अधिकार नाही. सदर संसदेत ज्या पक्षाला बहुमत असेल त्या पक्षाचा नेता स्कॉटलंडचा प्रथम मंत्री (फर्स्ट मिनिस्टर) बनतो. दिनांक १८ सप्टेंबर २०१४ रोजी ऐतिहासिक जनमताचा कौल होईपर्यंत स्कॉटलंडचे प्रथम मंत्री अलेक्स सालमंड हे होते व त्यांनीच स्कॉटलंड, युनायटेड किंगडमपासून स्वतंत्र (विभक्त) व्हावा या मोहिमेचे नेतृत्व केले होते. मात्र त्यांच्या मोहिमेला बहुसंख्य स्कॉटिश जनतेने ठाम नकार दिल्यानंतर त्यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला.

जर स्कॉटलंड युनायटेड किंगडम पासून विभक्त झाला असता तर त्याचे जगाच्या अर्थव्यवस्थेवर विपरित परिणाम झाले असते व अनेक जटिल आर्थिक समस्या निर्माण झाल्या असत्या. ह्या सर्वांचा फटका भारताच्या अर्थव्यवस्थेलादेखील बसला असता यात काही वाद नाही. तूर्तास स्कॉटलंड युनायटेड किंगडमसोबत राहिलेला आहे हे स्कॉटलंड व युनायटेड किंगडम तसेच सर्व जगासाठी योग्य आहे असे म्हणणे वावगे ठरणार नाही म्हणूनच दिनांक २० सप्टेंबर २०१४ च्या अंकात लोकसत्तेचे संपादक श्री. गिरीश कुबेर यांनी उद्‌बोधक अग्रलेख लिहिला आहे व त्या अग्रलेखाच्या शीर्षकाने या लेखाचा शेवट करावासा वाटतो........... 'स्कॉच उतरली...'

**संदर्भसूची**

१) वर्ल्ड बुक एनसायक्लोपेडिया

२) स्टेट्समन्स् इयरबुक - २०१४

३) लोकसत्ता - २० सप्टेंबर २०१४

**-प्राध्यापक सुभाष गं. शिंदे**
उपप्राचार्य व इतिहासविभाग प्रमुख
जोशी-बेडेकर महाविद्यालय, ठाणे.

●●●

दिशा
नियमित
वाचा.

आपली
मते
जाणून
घेण्यास
आम्ही
उत्सुक
आहोत.

कर्तव्ये चोखपणे पार पाडत राहा. हक्क आणि अधिकार तुमच्याकडे आपोआप चालत येतील.

# भास्कर ९०० या आंतरराष्ट्रीय परिषदेचा संक्षिप्त अहवाल

*भास्कराचार्य या थोर भारतीय गणितज्ञांच्या जन्माला नऊशे वर्षे पूर्ण झाली. त्या निमित्ताने विद्या प्रसारक मंडळाने एका आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन केले होते. त्याची थोडक्यात माहिती या लेखात दिलेली आहे - संपादक*

विद्या प्रसारक मंडळाच्या वतीने दिनांक १८ ते २१ सप्टेंबर २०१४ या कालावधीत एका आंतरराष्ट्रीय परिषदेचे ठाण्यात आयोजन करण्यात आले होते. भास्कराचार्य या थोर गणितज्ञाचा जन्म शालिवाहन शके १०३६ म्हणजे इसवी सन १११४ साली झाला. या महान भारतपुत्राच्या जन्माला ९०० वर्षे झालीत. त्याचे औचित्य साधून या परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. गणिताच्या क्षेत्रात भास्कराचार्यांची कामगिरी फारच मोलाची आहे. लीलावती, बीजगणित, ग्रहगणित, गोलाध्याय, करणकुतूहल, वासनभाष्य असे अनेक ग्रंथ त्यांनी लिहिले. जगतिक स्तरावर गणितात जे काम चालले होते त्या दृष्टीने विचार करता भास्कराचार्य सगळ्यांच्या पुढे होते. त्यांनी जे गणितीय सिद्धान्त १२ व्या शतकात सांगितले त्याची माहिती युरोपातील शास्त्रज्ञांना अनेक वर्षांनंतर झाली. अशा एक थोर गणितज्ञाच्या कार्याचा आढावा घेण्याचा प्रयत्न या परिषदेत करण्यात आला. त्याचा थोडक्यात अहवाल या लेखात सादर करण्यात आलेला आहे.

परिषदेच्या आयोजनाची सुरूवात एक वर्षापूर्वी झाली. डॉ. विजय बेडेकर यांच्या परिचयाचे प्राध्यापक श्रीरामुलू राजेस्वर सर्मा नावाचे एक तज्ज्ञ जर्मनीत राहतात. त्यांचा या विषयाचा दांडगा अभ्यास आहे. त्यांनी एका वर्षापूर्वी डॉ. बेडेकरांच्या असे लक्षात आणून दिले की भास्कराचार्यांच्या जन्माला शलिवहन शके १९३६ म्हणजे इसवी सन २०१४ ला ९०० वर्षे पूर्ण होतील. ही संधी साधून काही कार्यक्रम करण्याची गरज आहे असे त्यांनी प्रतिपादन केले. डॉ बेडेकरांना ही कल्पना फारच आवडली. त्याच दरम्यान जपानमधील संस्कृतचे गाढे अभ्यासक प्राध्यापक मिचिओ यॅनो भारतात आले होते. डॉक्टरानी त्यांच्याशी चर्चा केली. तेव्हा त्यांनीदेखील ही कल्पना उचलून धरली. सर्वानुमते असा निर्णय घेण्यात आला की भास्कराचार्यांच्या ९०० व्या जन्मशताब्दीनिमित्ताने एका आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात यावे. एकदा कल्पनेने मूर्त स्वरूप घेतल्यानंतर विचार सुरू झाला तो कालावधीचा. भारतीय सणवार, सुट्या, तज्ज्ञ व्यक्तींची उपलब्धता या सर्व बाबींचा विचार करून सप्टेंबर महिन्याचा तिसरा आठवडा परिषदेसाठी निश्चित करण्यात आला. शुक्रवार दि. १९, शनिवार दि. २० आणि रविवार दि. २१ सप्टेंबर २०१४ या तारखांना परिषद भरविण्यात यावी असे ठरले. त्यानंतर प्रश्न आला ठिकाणाचा. विद्या प्रसारक मंडळाने नुकतेच एक अभियांत्रिकी महविद्यालय वेळणेश्वर येथे सुरू केले आहे. सगळ्या सुविधांनी सुसज्ज असे हे महाविद्यालय परिषदेसाठी योग्य राहील असा विचार मांडण्यात आला. परंतु परदेशी तसेच देशाच्या विविध भागांतून येण्याऱ्या पाहुण्यांना तेथे पोहोचणे त्रासदायक होईल म्हणून तो विचार सोडून देण्यात आला आणि ठाण्यातच परिषदेचे आयोजन करावे असा निर्णय घेण्यात आला.

परिषदेची तारीख आणि ठिकाण या दोहोंची निश्चिती झाल्यानंतर परिषदेच्या आयोजनाच्या दृष्टीने हालचाली सुरू झाल्या. परिषदेत चर्चेचे विषय कोणते असावेत यावर बराच ऊहापोह झाला. चर्चेअंती खालील विषयांची निश्चिती करण्यात आली.

१. भास्कराचार्यांचे जीवन
२. भास्कराचार्यांची ग्रंथसंपदा व त्यावरील भाष्ये
३. भास्कराचार्यांच्या ग्रंथांची भाषांतरे
४. भास्कराचार्यांच्या कार्याचे खगोलशास्त्रीय महत्त्व
५. भास्कराचार्यांच्या कार्याचा गणिताच्या प्रगतीला हतभार
६. भास्कराचार्यांच्या कार्याचे शैक्षणिक महत्त्व

एकदा विषयांची निश्चिती झाल्यानंतर त्या विषयावर बोलू शकणाऱ्या तज्ज्ञ व्यक्तींचा शोध सुरू झाला. या कामी प्राध्यापक सर्मा यांची खूप मदत झाली. मागील अनेक दशके ते या क्षेत्रात असल्याने त्यांना या क्षेत्रातील अभ्यासू लोकांविषयी चांगली माहिती आहे. वेगवेगळ्या विषयतज्ज्ञांची नावे त्यांनी सुचवली. त्यानुसार त्यांच्याशी संपर्क साधण्यात आला आणि त्यांच्या विषयाला अनुसरून त्यांनी भाषण द्यावे अशी त्याना विनंती करण्यात आली. आमच्या विनंतीला उत्तम प्रतिसाद मिळाला. चेन्नई, बंगळुरू, पॅरिस, न्यूयॉर्क, क्राइस्टचर्च, क्योटो, ओसाका, तेहरान, मुंबई अशा वेगवेगळ्या ठिकाणी राहणाऱ्या तज्ज्ञ व्यक्तींनी परिषदेला येण्याचे कबूल केले. त्यानंतरचे मोठे आव्हान होते परिषदेच्या जाहिरातीचे. भारतात भास्कराचार्यांच्या कार्याशी संबंधित परिषद भरते आहे याची माहिती या विषयातील संशोधकांपर्यंत पोहोचणे आवश्यक होते. यासाठी पत्रके छापून ती सर्वत्र वाटण्यात आली. याहीपेक्षा प्रभावी मार्ग ठरला तो गणपत्राचा. विविध शिक्षण आणि संशोधन संघटनांच्या सभासदांची यादी मिळवून त्यांना गणपत्रांच्या मदतीने परिषदेची माहिती देऊन परिषदेत सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले. आमच्या आवाहनाला चांगला प्रतिसाद मिळाला. जगाच्या वेगवेगळ्या भागांतून प्रबंधांचे संक्षिप्त सार आमच्याकडे मोठ्या प्रमाणावर आले. त्या सर्वांचा विचार करून त्यांतील ४६ प्रबंध सादरीकरणासाठी निवडण्यात आले. त्यांची विषयवार आखणी करून एक साचेबद्ध असा कार्यक्रम तयार करण्यात आला. सकाळच्या सत्रात तज्ज्ञाची व्याख्याने आणि दुपारच्या सत्रात प्रबंधांचे सादरीकरण असे परिषदेचे स्वरूप ठरविण्यात आले.

परिषदेची सुरुवात १८ सप्टेंबर रोजी ठाणे महाविद्यालय परिसरात असलेल्या थोरले बाजीराव पेशवे सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या उदघाटन समारंभाने झाली. या समारंभाचे प्रमुख पाहुणे होते पद्मविभूषण डॉ. अनिल काकोडकर. आपल्या उद्घाटनपर भाषणात त्यांनी परिषदेचे ठाण्यात आयोजन केल्याबद्दल विद्या प्रसारक मंडळाचे कौतुक केले आणि सरकारी स्तरावर या महत्त्वपूर्ण घटनेची नोंददेखील घेतली गेली नाही याबद्दल खंत व्यक्त केली. १९ सप्टेंबर रोजी सकाळी ९.३० वाजता परिषदेच्या कामकाजाला औपचारिकरीत्या प्राध्यापक श्रीकृष्ण दाणी यांच्या बीजभाषणाने सुरुवात झाली. आपल्या अभ्यासपूर्ण व्याख्यानात त्यांनी भारताची गणितीय परंपरा आणि त्यात भास्कराचार्यांचे योगदान यावर प्रकाश टाकला. त्यानंतर आय. आय. टी. मुंबई येथील संशोधक प्राध्यापक रामसुब्रमनिअन यांनी लीलावतीमधील लीला यावर सुंदर व्याख्यान दिले. संस्कृत श्लोकांचा उल्लेख करून त्यानी सोप्या इंग्रजीमध्ये त्यांचा अनुवाद करून दाखविला. त्यानंतर चेन्नई येथील संशोधिका प्राध्यापिका सीता सुंदरराम यांनी भास्कराचार्यांनी लिहिलेल्या बीजगणित या दुसऱ्या ग्रंथाची माहिती दिली. त्यानंतर दुपारच्या वेळेत दोन समांतर सत्रांमध्ये १२ प्रबंधांचे सादरीकरण झाले. संध्याकाळी सर्वांच्या मनोरंजनासाठी एका सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे सादरीकरण जोशी-बेडेकर महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी केले.

परिषदेच्या दुसऱ्या दिवशी म्हणजे शनिवार दिनांक २० सप्टेंबर रोजी सकाळच्या सत्रात तीन भाषणे झाली. त्यांतील पहिल्या भाषणासाठी डॉ अरविंद जामखेडकर याना पाचारण करण्यात आले होते. त्यांनी भास्कराचार्यांच्या काळात विद्वानांना मिळणाऱ्या

आश्रयाबद्दल ऊहापोह केला. अनेक शिलालेखांचा आधार घेऊन त्यांनी असे दाखविले की त्या काळात ज्ञानार्जनाला विशेष महत्त्व दिले जायचे. त्या आश्रयाचा आधार घेऊन अनेक विद्वानांनी ज्ञानवृद्धीचे काम केले. त्यानंतर फ्रान्समधील पॅरिस येथे कार्यरत असलेले प्राध्यापक फिलिओजा यांनी भास्कराचार्यांच्या लेखनातील काव्याचे विश्लेषण केले. हे गृहस्थ पॅरिस विद्यापीठातील संस्कृत विभागात कार्यरत असून संस्कृत ग्रंथांचा अभ्यास हेच त्यांनी आपले जीवितकार्य ठरविले आहे. या क्षेत्रात त्यांनी चांगलेच नाव कमविले आहे. संस्कृत भाषेतील ग्रंथांच्या त्यांनी केलेल्या अभ्यासाची दखल घेऊन भारत सरकारने त्यांना नुकतेच एक पारितोषिक जाहीर केले आहे. त्याननंतरचे व्याख्यान प्राध्यापक श्रीराम यांनी दिले. भास्कराचार्यांनी लिहिलेल्या ग्रहगणित या ग्रंथावर त्यांनी भाष्य केले. त्यांचा या विषयातील अभ्यास दांडगा आहे. त्यामुळे प्रेक्षकांमधून त्यांना उत्तम प्रतिसाद मिळाला.

आदल्या दिवसाप्रमाणे या दिवशीदेखील दुपारच्या वेळेत समांतर सत्रांचे आयोजन करण्यात आले होते. या सत्रात १२ प्रबंधांचे सादरीकरण झाले. पहिल्या समांतर सत्राचे विषय होते भास्कराचार्यांची काव्यप्रतिभा आणि करणकुतूहल तर दुसऱ्या समांतर सत्राचे विषय होते सिद्धान्तशिरोमणी आणि भास्कराचार्यांचा अध्यापन दृष्टिकोन. दोन्हीही समांतर सत्रे माहितीपूर्ण अशीच झाली. प्रत्येकाने आपले अभ्यासपूर्ण असे प्रबंध सादर केले. दिवसभराच्या तांत्रिक चर्चेमुळे आलेला शीण घालविण्यासाठी त्या दिवशी संध्याकाळीदेखील एका सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन केले होते. यासाठी मदनापल्ली येथील रिशी व्हॅली स्कूलमधील विद्यार्थ्यांच्या एका समूहाला पाचारण करण्यात आले होते. भरतनाट्यम या प्रसिद्ध नृत्यप्रकाराच्या आधार घेऊन या गटाने लीलावतीमधील काही श्लोकांचा उलगडा करून दाखविला. या कार्यक्रमाचे सर्वानीच खूप कौतुक केले.

परिषदेच्या तिसऱ्या दिवशी सकाळच्या सत्रात तीन भाषणांचे आयोजन करण्यात आले होते. त्या दिवशीचे पहिले वक्ते होते बंगळुरू येथून आलेले प्राध्यापक बालचंद्र राव. भास्कराचार्यांनी लिहिलेला करणकुतूहल हा ग्रंथ त्यांच्या अभ्यासाचा विषय आहे. या ग्रंथात आकडेमोड करण्याची जी पद्धत भास्कराचार्यांनी वापरली त्या बाबीवर त्यानी प्रकाश टाकला. स्वतः केलेल्या संशोधनाच्या आधारे त्यांनी केलेले सदरीकरण लोकांना खूप आवडले. त्यानंतर प्राध्यापक श्रीनिवास यांचे भाषण झाले. त्यांनी भास्कराचार्यांनी लिहिलेल्या वासनभष्य या ग्रंथावर आपले लक्ष केंद्रित केले. या ग्रंथातील गणित आणि खगोलशास्त्र या दोन बाबींवर त्यांनी आपले विचार मांडले. त्या दिवशीचे शेवटचे व्याख्यान होते प्राध्यापक सर्मा यांचे. त्यांनी खगोलीय संशोधनासाठी वापारावयांच्या ज्या ज्या उपकरणांचा उल्लेख भास्कराचार्यांच्या सिद्धान्तशिरोमणी या ग्रंथात झालेला आहे त्या सर्वांची सचित्र माहिती दिली. दुपारचा वेळेत पहिल्या समांतर सत्रामध्ये चार प्रबंधांचे सादरीकरण झाले. त्यांचे विषय होते सिद्धान्तशिरोमणी आणि अध्यापन पद्धती. परिषदेतील शेवटचे सत्र मात्र एकत्रित असेच घेण्यात आले. या सत्रात ओसाका (जपान) मधील प्राध्यापक कुसुबा, क्राइस्टचर्च (न्यूझीलॅन्ड) येथील क्लिमेंसी मोंटेल आणि न्यूयॉर्क (अमेरिका) येथील किम प्लोफ्कर यांनी आपले अभ्यासपूर्ण प्रबंध सादर केले. त्यांच्या सादरीकरणातून भास्कराचार्यांच्या कामासंबंधी त्यांच्या देशात किती सखोल संशोधन चालते याची सर्वांना चांगली कल्पना आली.

परिषदेचा सांगता कार्यक्रम तिसऱ्या दिवशी संध्याकाळी आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाला आय. आय. टी. मुंबई येथील ज्येष्ठ संशोधक प्राध्यापक दीपक फाटक यांना प्रमुख पाहुणे म्हणून पाचारण करण्यात आले होते. आपल्या अभ्यासपूर्ण भाषणात त्यांनी विज्ञान इतिहासाचा पद्धतशीर अभ्यास करण्याची गरज

---

खऱ्या शत्रूच्या शत्रुत्वापेक्षा खोट्या मित्राची मैत्री अधिक धोकादायक असते.

प्रतिपादित केली आणि त्या दृष्टीने एक पाऊल पुढे टाकल्याबद्दल विद्या प्रसारक मंडळाचे त्यांनी अभिनंदन केले. त्याआधी परिषदेच्या सभासदांनी परिषदेच्या आयोजनासंबंधी आपले विचार मांडले. या परिषदेच्या निमित्ताने अनेक देशांतील संशोधक एकत्र आले. त्यांच्यात विचारांची देवाणघेवाण झाली. हा संपर्क पुढेही चालू राहावा अशी इच्छा अनेक सभासदांनी व्यक्त केली. त्यासाठी गुगल ग्रुप बनविण्याचा विचार मांडण्यात आला. लवकरच या सूचनेला मूर्त रूप देण्यात येईल.



**परिषदेत सहभागी झालेले विषयतज्ज्ञ**

विद्या प्रसरक मंडळ ठाण्यात मागील अनेक वर्षे कार्यरत आहे. या मंडळाच्या वतीने शहरात अनेक शाळा आणि महाविद्यालये चालविली जातात. याआधी मंडळाच्या वतीने राष्ट्रीय स्तरावरील अनेक परिषदा यशस्वीपणे आयोजित करण्यात आल्या; परंतु आंतरराष्ट्रीय स्तरावर परिषदेचे आयोजन करण्याची मंडळाची ही पहिलीच वेळ होती. हे काम आतिशय यशश्वीपणे केल्याबद्दल मंडळाचे सर्वत्र कौतुक केले जात आहे. परिषदेचे आयोजन अतिशय पद्धतशीरपणे करण्यात आले. सगळी सत्रे वेळेवर सुरू होऊन वेळेवर संपतील याची दक्षता घेण्यात आली. त्याहीपेक्षा महत्त्वाचे म्हणजे मंगलाचरणाचा योग्य वापर. उद्घाटनाचे भाषण, बीजभाषण, निमंत्रित भाषणे तसेच सांगता समारंभाचे भाषण या सर्वांच्या आधी एक समर्पक असे मंगलाचरण सादर केले जायचे. प्राध्यापक रामसुब्रमनिअन यांनी जातीने लक्ष घालून या मंगलाचरणांची निवड केली होती. त्यांतील बरेचसे श्लोक भास्कराचार्यांच्या लेखणीतूनच उतरले होते. मंगलाचरणांच्या निवडीबरोबरच प्राध्यापक रामसुब्रमनिअन यांनी ती गाण्यासाठी योग्य व्यक्तींची निवडदेखील केली. त्यांच्या मधुर आवाजातील मंगलाचरणाने सभागृहातील वातावरणच बदलून जायचे. परिषदेत सहभागी झालेल्या सर्वच सभासदांनी मंगलाचरणाचा समावेश केल्याबद्दल आयोजकांची स्तुती केली.

परिषदेत सादर करण्यात आलेल्या व्याख्यानांचे आणि प्रबंधांचे एकत्रीकरण करून एका पुस्तिका प्रकाशित करण्याचा मानस आहे. काही महिन्यातच ती पुस्तिका तयार होईल. मधल्या काळात ज्यांना या परिषदेची माहिती हवी आहे त्यानी विद्या प्रसारक मंडळाच्या संकेतस्थळाला भेट द्यावी. संकेतस्थळाचा पत्ता आहे _www.vpmthane.org हे संकेतस्थळ म्हणजे ज्ञानाचे एक भांडारच आहे. तेथे भास्कराचार्यांच्या ग्रंथांची भाषांतरे उपलब्ध करून दिलेली आहेत. त्याचबरोबर भास्कराचार्यांच्या कार्यावर जे जे संशोधन झाले आहे त्याची माहितीदेखील दिलेली आहे. वाचकांकडे असे काही साहित्य असल्यास त्यांनी आमच्याकडे पाठवावे. आम्ही त्या साहित्याचे अंकेक्षण करून संकेतस्थळावर उपलब्ध करून देऊ.

**डॉ. सुधाकर आगरकर**
विप्रमची आंतरराष्ट्रीय शिक्षण आणि
संशोधन संस्था,
ठाणे, महाराष्ट्र राज्य

•••

## काही क्षणचित्रे



परिषदेचे उद्‌घाटन



प्रा. श्री. गो. दाणी बीजभाषण देताना



मंगलाचरणांचे सादरीकरण



प्रा. सीता सुंदरराम व्याख्यान देताना



प्रा. रामसुब्रमनिअन आपले विचार मांडताना




प्रा. मिचिओ यॅनो आपला प्रबंध सादर करताना

---


शहाणी माणसे निरर्थक गोष्टींमागे धावण्यात आपली शक्ती कधीही वाया घालवत नाहीत.




प्रा. सर्मा आपले विचार मांडताना




अमेरिकन संशोधक डॉ. किम प्लोफ्कर आपला प्रबंध सादर करताना




फ्रेंच प्राध्यापक फिलिओज़ा आपले विचार मांडताना



सांगता समारंभाचे प्रमुख पाहुणे प्रा. दीपक फाटक यांचे स्वागत करताना डॉ. विजय बेडेकर



जोशी-बेडेकर महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेला सांस्कृतिक कार्यक्रम



रिशी व्हॅली शाळेतील विद्यार्थ्यांनी सादर केलेला सांस्कृतिक कार्यक्रम

प्रार्थना हे मनाचे स्नान असते. - साने गुरुजी

# परिसर वार्ता

**- संकलित**

## डॉ. बेडेकर विद्या मंदिर, पूर्व प्राथमिक विभाग

शैक्षणिक क्षेत्रातील जून महिन्याची नवलाई काही आगळीच असते. शिक्षक, पालक व मुले यांचे नवीन वर्ष सुरू होते. अतिशय उत्साहाने व प्रेमाने या लहान मुलांचे स्वागत (शिशुवर्गातील) दि. १७ जून, २०१४ रोजी गोळ्या वाटून करण्यात आले. वर्गातील पताका, फुगे, फळ्यांवरील चित्रे पाहून मुले हरखून गेली होती. पहिले काही दिवस शाळा अर्धवेळ ठेवण्यात आली होती.

**पहिली पालकसभा** : शाळेतील नियम, शाळेत साजरे होणारे सण, स्पर्धा या सर्वांची माहिती पालकांना व्हावी यासाठी दि.२८/६/२०१४ रोजी पहिली पालकसभा झाली.

**दि. १/७/२०१४** पासून शाळेतील पटसंख्या कमी झाल्यामुळे शिक्षकांच्या वेळेत खालीलप्रमाणे बदल करण्यात आला.

लहान शिशू - स.१०.१५ ते दु.२.४५

मोठा शिशू - दु. १२.१५ ते दु.४.४५

**आषाढी एकादशी, गुरुपौर्णिमा, दिव्यांची आवस :**

दि.८/७/२०१४ या दिवशी पूर्व प्राथमिक विभागात संतमेळा भरला होता. वारकऱ्यांची दिंडी हरिनामाचा गजर करत पंढरपूरला चालली होती. आषाढी एकादशीचे औचित्य साधून मोठ्या शिशूंची दिंडी काढण्यात आली.

आपल्यावर चांगले संस्कार करणाऱ्या, ज्ञान देणाऱ्या व्यक्तींबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्याचा दिवस म्हणजे ''गुरुपौर्णिमा''. दि.११/७/२०१४ रोजी वर्गातील निवडक मुलांच्या गुरु-शिष्याच्या जोड्या तयार करून मुलांना गुरुपौर्णिमेचे महत्त्व पटवून देण्यात आले.

आपल्या प्रकाशाने सर्वांचे जीवन उजळून टाकणाऱ्या व स्वतः जळून दुसऱ्यांचे जीवन प्रकाशमय करावे ही प्रेरणा देणाऱ्या दिव्यांविषयी कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी दि. २७/२/२०१४ रोजी 'दिव्यांची आवस' साजरी करण्यात आली. निरांजन, समई, लामणदिवा, कंदील, भुत्या, चिमणी, मेणबत्ती, बॅटरी, नंदादीप इ. सर्व दिव्यांची ओळख मुलांना करून देण्यात आली. वेगवेगळ्या आकारांचे दिवे पाहून मुले हरखून गेली होती.

**नागपंचमी, रक्षाबंधन, १५ ऑगस्ट, श्रावणी शुक्रवार :**

मुलांच्या मनातील 'नाग' ह्या प्राण्याविषयी असलेली भीती निघून जावी यासाठी नागपंचमी हा सण साजरा करण्यात येतो. मातीचे वारूळ करून त्यावर मातीचे नाग ठेवण्यात आले होते. पाटावर नाग-नागीण व तिची सात पिल्ले काढून त्यांची पूजा केली गेली. नागपंचमीच्या गोष्टी मुलांना सांगण्यात आल्या.

व्रतवैकल्ये व सण यांची रेलचेल म्हणजे श्रावण महिना. आजकालच्या जगात नाती शिल्लक राहिलेली नाहीत. म्हणूनच मुलांच्या मनात बहीण-भावाचे पवित्र नाते बिंबवण्यासाठी 'रक्षाबंधन' हा सण दि.८/८/२०१४ रोजी साजरा करण्यात आला. मुलींनी वर्गातील मुलांना राख्या बांधल्या तर मुलांनी त्यांना भेट म्हणून टिकल्यांची पाकिटे दिली. नंतर सर्वांना औक्षण करण्यात आले.

मुलांनी राष्ट्रध्वजाचा मान राखावा, त्याचे महत्त्व त्यांना पटावे म्हणून दि. १३/८/२०१४ रोजी सर्व मुलांकडून कागदी राष्ट्रध्वज तयार करून ते रंगवून घेण्यात आले. 'प्लॅस्टिकचे झेंडे वापरू नका, पर्यावरणाचे रक्षण करा' हा संदेश यातून मुलांना देण्यात आला. वर्गावर्गातून जिवतीचा कागद लावून श्रावणी शुक्रवार साजरा करण्यात आला.

**दहिहंडी-गणपती उत्सव** :- श्रीकृष्णाचे वेड लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वांना आहे. सर्वांनी एकत्र येऊन एकोप्याने सण साजरा करण्यासाठी विद्यालंकार हॉलमध्ये दहिहंडी बांधण्यात आली होती. दि. १४/८/२०१४ रोजी सर्वत्र उत्साहाचे वातावरण होते. लहान व मोठ्या शिशूंतील मुलांनी कृष्णाचा वेष परिधान केला होता. मुली गोपिका बनून आल्या होत्या. 'गोविंदा रे गोपाळा' म्हणत मुलांनी उत्साहाने दहिहंडी फोडली.

वर्षभर शेतात राबून आपल्यामुखी अन्न पडावे यासाठी 'बैल' राबत असतात. अशा या प्राण्यांविषयी कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी मातीची बैलजोडी आणून त्यांची पूजा करून 'बैलपोळा' हा सण साजरा केला.

सर्वांचे लाडके दैवत 'गणपतिबाप्पा'. अशा या गणपतिबाप्पाचे आगमन पूर्व प्राथमिक विभागात दि. २७/८/२०१४ रोजी आले. अत्यंत सुबक व सुंदर असे शाडूचे गणपती आणून त्यांचे महत्त्व मुलांना सांगण्यात आले. सुंदर अशा मखरात सभोवताली दिव्यांची आरास, उदबत्तीचा घमघमाट या चैतन्यमय वातावरणात गणराज विराजमान झाले. सर्व मुलांनी, शिक्षकांनी आरत्या, गणपतिस्तोत्र म्हटले. मुख्याध्यापिका वैद्यबाईंनी गणपतीची पूजा केली. पर्यावरणाचे महत्त्व पटावे यासाठी शाडूचे गणपती व इको फ्रेंडली मखर होते.

दि. ९/९/२०१४ रोजी या गणपतिबाप्पाचे अत्यंत साधेपणाने विसर्जन करण्यात आले. बादलीमध्ये गणपतिबाप्पाचे विसर्जन करण्यामागचे कारण 'पाणी वाचवा व पाण्याचे प्रदूषण टाळा' हे मुलांना पटवण्यासाठी होते.

## बांदोडकर विज्ञान विद्यालय

### ''जागर जाणिवांचा'' अभियान

राज्य सरकारच्या 'जागर जाणिवांचा' या अभियानांतर्गत ठाणे जिल्ह्यातून प्रथम क्रमांकाचा पुरस्कार विद्या प्रसारक मंडळ, ठाणे यांच्या बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाने प्राप्त केला आहे. एक लाख रुपये, स्मृतिचिन्ह आणि प्रमाणपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

देशाच्या व राज्याच्या सुरक्षित आणि उज्ज्वल भविष्यासाठी, पुढच्या पिढीच्या सर्वांगीण विकासासाठी तसेच युवा पिढीच्या मनात स्त्री-पुरुष समानतेचे बीज रुजविण्यासाठी राज्यशासन महाविद्यालय पातळीवर 'जागर जाणिवांचा' अभियान राबवीत आहे.

या अभियानांतर्गत बा. ना. बांदोडकर महाविद्यालयाने विद्यार्थी उपक्रमांच्या माध्यमातून समाजातील स्त्री-पुरुष समानतेची समस्या जाणून त्यावर उपाय शोधण्याचा प्रयत्न केला आहे. त्याअंतर्गत निबंधलेखन, काव्यवाचन, काव्यलेखन, पथनाट्य सादरीकरण, प्रभातफेरी, भित्तिपत्र स्पर्धा, रंगीत अशा विविध माध्यमांतून त्याकडे लक्ष केंद्रीत केले. सोबतच पालकांचे समुपदेशन करणे, महाविद्यालयाचा परिसर छेडछाडमुक्त करणे, रॅगिंगला आळा घालणे तसेच विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देणारे विविध उपक्रम २०१३-१४ या वर्षात महाविद्यालयामार्फत राबविण्यात आले होते.

२०१४-१५ या शैक्षणिक वर्षात बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाला मुंबई विद्यापीठातर्फे ४ नवीन अभ्यासक्रम सुरू करण्याची मान्यता मिळाली.

1) B.Sc. Human Science
2) B.Sc. Interdisciplinary Science &
3) M.Sc. Biodiversity, Wild Life Conservation & Management
4) NCC as Optional Subject for FC.

काय मानलं जातं यापेक्षा वस्तुस्थिती काय आहे याची शहानिशा करूनच कोणत्याही गोष्टीवर विश्वास ठेवावा.

B.Sc.Human Science या अभ्यासक्रमात व्यवस्थापन, मानवी मानसशास्त्र, उत्क्रांतिवाद, संभाषणकौशल्य विकास इत्यादी विषयांचा समावेश करण्यात आला आहे. कला अथवा विज्ञान शाखेतून बारावी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना या अभ्यासक्रमाला प्रवेश घेता येऊ शकतो.

B.Sc.Interdisciplinary Science करता विज्ञान शाखेतून बारावी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना या अभ्यासक्रमाला प्रवेश घेता येऊ शकतो. ह्या अभ्यासकेंद्रात विद्यार्थ्यांना विज्ञानाच्या दोन विषयांबरोबर कला व वाणिज्य शाखेतील तसेच व्यवस्थापन, बँकिंग व्यवहार आदींविषयी ज्ञान मिळते जे त्याला स्वतःच्या पुढील आयुष्यात उपयोगी आहे, पण पुढे तो जेथे नोकरी करेल त्या संस्थेलाही ह्या ज्ञानाचा फायदा होऊ शकतो. या वर्षी प्रथमच मुंबई विद्यापीठाने १०० मार्कांच्या फाउंडेशन कोर्सऐवजी NCC अभ्यासक्रमाला मान्यता दिली.

M.Sc. Biodiversity, Wild Life Conservation & Management कोणत्याही विज्ञान विषयातून पदवी प्राप्त झालेल्या विद्यार्थ्याला या अभ्यासक्रमाला प्रवेश घेता येऊ शकतो. अनेक शासकीय, अशासकीय व खासगी संस्थांमध्ये अशा प्रकारच्या पदव्युत्तर शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांची आवश्यकता असते. हा अभ्यासक्रम उपलब्ध असणारे मुंबई विद्यापीठातील हे एकमेव विज्ञान महाविद्यालय आहे.

जैवतंत्रज्ञान व सूक्ष्मजीवशास्त्र विभागातर्फे २८ जून २०१४ रोजी स्पर्धा परीक्षांची तयारी कशी करावी या विषयावर एक व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. याकरता प्रमुख पाहुणे म्हणून आमच्याच महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थिनी व All India Biotech M.Sc. Entrance Exam यशस्वीपणे पूर्ण केलेल्या कु. प्रियांका बारमुख व कु. ऋचा कुलकर्णी यांना आमंत्रित केले होते. त्यांनी अशा परीक्षांची तयारी कशी करावी याबद्दल थोडक्या शब्दांत, पण सोप्या भाषेत विद्यार्थ्यांना सांगितले.

भौतिकशास्त्र विभागातर्फे "Guest Lecture on Physic by Young Scientist" ही एक व्याख्यानमाला आयोजित करण्यात आली आहे. या व्याख्यानमालेचे पहिले व्याख्यान "Research work in Astronomy" या विषयावर दिनांक २८ जून २०१४ रोजी श्री. अमित सेता यांनी दिले. भौतिकशास्त्र विषयात संशोधन करायचे असल्यास भौतिकशास्त्र विषयाचा अभ्यास कसा करावा, याबद्दल त्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला.

दि. ५ जुलै २०१४ रोजी या व्याख्यानमालेचे दुसरे व्याख्यान "The science of space weather" या विषयावर इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ जिओमॅग्नेटिझम, पनवेल येथील शास्त्रज्ञ श्री. अंकुश भास्कर यांनी दिले. या वेळी त्यांनी सूर्य व सूर्यमाला यांबद्दल माहिती दिली.

या मालेतील, तिसरे व्याख्यान १२ जुलै २०१४ रोजी "Atomic Collision in highly charged ions and plasma" या विषयावर इन्स्टिट्यूट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजी, माटुंगा येथील शास्त्रज्ञ प्रा. सिद्धार्थ कस्तुरीरंग यांनी दिले. या वेळी त्यांनी कार्बन ६० मॉडेल व ॲटॉमिक मॉलिक्युलर सिद्धान्त याबद्दल विद्यार्थ्यांना अतिशय सोप्या भाषेत मार्गदर्शन केले.

जैवतंत्रज्ञान व सूक्ष्मजीवशास्त्र या विभागातर्फे Movie club व Journal club उपक्रम राबवला जातो. विद्यार्थ्यांमध्ये समाधीटपणा येण्याच्या दृष्टीने व सादरीकरण कसे करावे याबाबत माहिती व्हावी या उद्देशाने हा कार्यक्रम घेण्यात येतो. यामध्ये विद्यार्थ्यांनी केलेली सादरीकरण खालीलप्रमाणे आहेत.

| | अ. न. | इयत्ता | विद्यार्थ्यांचे नाव | सादरीकरणाचे शीर्षक |
|---|---|---|---|---|
| Journal club | १. | प्रथम वर्ष जैवतंत्रज्ञान | स्लेषा शिंदे रिंची अगरवाल | Industrial application of Bacterial exospores |
| | २. | प्रथम वर्ष जैवतंत्रज्ञान | ओमकार जोशी निखिल पहेलकर | Production of PHB by marine bacteria |
| | ३. | प्रथम वर्ष सूक्ष्मजीवशास्त्र | यश देशपांडे सुभाष खत्री | Screening of thermophilic cyanobacteria for antibacterial products |
| Movie club | १. | द्वितीय वर्ष जैवतंत्रज्ञान | आदित्य छत्रे | Movie club Mechanism of DNA replication |

**पालक सभा**

पालकांना विद्यार्थ्यांची महाविद्यालयातील प्रगती माहीतव्हावी, महाविद्यालयातर्फे घेण्यात येणारे उपक्रम व सेवा सुविधा माहीत करून घेण्यासाठी पालक सभांचे आयोजन केले जाते.

प्रथम वर्ष जैवतंत्रज्ञान व सूक्ष्मजीवशास्त्रामध्ये शिकत असणाऱ्या विद्यार्थ्यांची पालक सभा १६ ऑगस्ट २०१४ रोजी पतंजली सभागृहात घेण्यात आली. ३० पालक या सभेला उपस्थित होते.

प्रथम, द्वितीय व तृतीय वर्ष जैवरसायनशास्त्रामध्ये असणाऱ्या विद्यार्थ्यांची पालक सभा २५ जुलै २०१४ रोजी पतंजली सभागृहात घेण्यात आली.

**Biochemistry club**

जैवरसायनशास्त्र विभागाच्या क्लबचे उद्घाटन ६ ऑगस्ट २०१४ रोजी उपप्राचार्य डॉ. रघुनंदन प्रभाकर आठल्ये यांच्या हस्ते झाले. या क्लबचे नाव ठेवण्याकरता विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धा घेण्यात आली होती. द्वितीय वर्ष विज्ञान शाखेत शिकत असलेल्या धनश्री पाटील हिने सुचविलेले 'जीविका' हे नाव या क्लबला देण्यात आले.

तसेच या वेळी डॉ. नूपुर मेहरोत्रा, संयोजक, जैवरसायनशास्त्र क्लब, मिठीबाई महाविद्यालय या विशेष अतिथी म्हणून उपस्थित होत्या. त्यांनी Food & Drug Interaction या विषयावर अतिशय नेटक्या भाषेत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

**अभिनंदन**

**१) हितेश विश्वास म्हात्रे, इयत्ता १२ वी**
आई एकवीरा प्रतिष्ठान, डोंबिवली पुरस्कृत कॅसिओ वादन स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला.

**२) कु. पूनम बोराडे, इयत्ता ११ वी**
प्रारंभ कला ॲकॅडमी पुरस्कृत कॅ. कमल भालेराव स्मृती नाट्यछटा स्पर्धेत द्वितीय क्रमांक प्राप्त केला.

**३) कु. रेवती मेदी, प्रथम वर्ष (बायोटेक)**
मुंबई विद्यापीठ आयोजित ४७ व्या युवक महोत्सवच्या क्लासिकल नृत्य स्पर्धेत प्रथम क्रमांक प्राप्त केला.

**४) प्रा. प्रकाश माळी, रसायनशास्त्र विभाग**
यांचे **'शास्त्रज्ञांच्या विश्वात'** हे पुस्तक प्रकाशित झाले.

५) प्रा. प्रकाश माळी यांना २०१४ मध्ये विविध पुरस्कारांनी गौरवण्यात आले.

---

प्रत्येकाला मर्यादा असतातच, पण चतुर माणसे आपल्या मर्यादांवर हुशारीने मात मरून यशाचे ध्वज फडकवत ठेवतात.

| संस्था | स्तर | पुरस्कार |
|---|---|---|
| राष्ट्रीय महिला व विकास प्रशिक्षण संस्था, कल्याण | राज्यस्तरीय | डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजसेवा पुरस्कार |
| बहिणाबाई साहित्य संस्था, डोंबिवली | राज्यस्तरीय | बहिणाबाई चौधरी साहित्य पुरस्कार |
| लेक लाडकी अभियान, मुंबई | राज्यस्तरीय | भारतरत्न महर्षी कर्वे समाजसुधारक पुरस्कार |

प्रा. अनिल आठवले यांना समर्थ महिला चॅरिटेबल ट्रस्ट, ठाणे चा 'द ग्रेट कार्यकर्ता पुरस्कार २०१४' प्राप्त झाला.

बा. ना. बांदोडकरच्या कलामंडळाने ९ ऑगस्ट रोजी रिक्षाचालक बांधवांना राखी बांधून त्यांना रिक्षातून प्रवास करणाऱ्या स्त्रियांच्या रक्षणाची जबाबदारी त्यांची असल्याची जाणीव करून दिली. तसेच झाडांना राखी बांधून, पर्यावरणाविषयी प्रेम व्यक्त करणारे आगळेवेगळे रक्षाबंधन साजरे केले.

कोरियामधील 'इंटरनॅशनल यूथ फेलोशिप' या संस्थेचा मनाला कणखर व बळकट कसे करावे या विषयावर माहिती देणारा कार्यक्रम ८ ऑगस्ट २०१४ रोजी सादर झाला. ज्यात सुमारे २५० विद्यार्थी व २५ शिक्षक सहभागी झाले होते. ह्याच संस्थेच्या ४ दिवसांच्या कार्यशाळेत महाविद्यालयातील १० विद्यार्थी सहभागी झाले होते.

नासिक येथील 'प्रबोधन' समाजसेवी संस्थेने MPSC, UPSC परीक्षांसाठी विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करण्याकरता दि. ९ ऑगस्ट २०१४ रोजी विशेष कार्यक्रम आयोजित केला ज्याला ३०० विद्यार्थ्यांचा उस्फूर्त प्रतिसाद मिळाला.

## विद्या प्रसारक मंडळाचे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय

### प्रवेश प्रक्रिया

L.L.B.च्या परीक्षेचे निकाल उशिरा लागल्याकारणाने द्वितीय व तृतीय वर्ष विधीची प्रवेश प्रक्रिया ऑगस्ट महिन्याच्या दुसऱ्या व तिसऱ्या आठवडशिंत पार पाडली.

प्रथम वर्ष विधी प्रवेश प्रक्रियेची पहिली यादी १ ऑगस्ट रोजी जाहीर झाली आणि प्रवेश प्रक्रियेस सुरुवात झाली. ऑगस्टच्या शेवटापर्यंतदेखील प्रवेश प्रक्रियेचे काम पूर्ण झाले नाही.

### प्रथम वर्ष विधीचे वर्ग

प्रथम वर्ष विधीचे वर्ग ह्याप्रमाणे सुरू करण्यात आले.

प्रथम वर्ष विधी 'अ' आणि 'ब' - १४ ऑगस्ट २०१४
प्रथम वर्ष विधी 'क' - २२ ऑगस्ट २०१४
प्रथम वर्ष विधी 'ड' - २६ ऑगस्ट २०१४

### संघ लोकसेवा आयोग परीक्षा

नागरी सेवा (पूर्व) परीक्षा २४ ऑगस्ट २०१४ रोजी घेण्यात आली. आमचे महाविद्यालय विषय क्रमांक (०१९) चे सेंटर होते. २८८ विद्यार्थ्यांनी परीक्षेकरता नावनोंदणी केली होती. परीक्षा दोन सत्रांमध्ये विभागण्यात आली होती. प्रथम सत्र ९.३० ते ११.३० आणि द्वितीय सत्र २.३० ते ४.३०. संघ लोकसेवा आयोगाच्या मार्गदर्शनानुसार कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यात आली व परीक्षा सुरळीत रितीने पार पडली. ठाणे जिल्ह्याचे आयुक्त हे ठाण्यातील परीक्षेचे कोऑर्डिनेटर होते, तर उपआयुक्त श्री. कालंडे हे आमच्या सेंटरचे लायझन ऑफिसर होते.

### आंतर महाविद्यालयीन PPT स्पर्धा

व्हि.प्र.मं.च्या जोशी-बेडेकर महाविद्यालयाने दि.२३ ऑगस्ट २०१४ रोजी आंतरमहाविद्यालयीन पॉवरपॉइंट

प्रेझेंटेशन स्पर्धा आयोजित केली होती. "Quest for Gender Equality" हा स्पर्धेचा विषय होता. आमच्या महाविद्यालयातर्फे तृतीय वर्ष विधीच्या विद्यार्थिनी कु. कृष्णा कामत व कु. रंजनी कृष्णन यांनी सहभाग घेतला. ''कायदा आणि संघटनात्मक समानतेचे संरक्षण करणे'' ह्या विषयावर त्यांनी आपले प्रेझेंटेशन सादर केले.

### जपानी विद्यार्थ्यांनी आमच्या महाविद्यालयाला दिलेली भेट

आपण सर्व व्हि.पी.एम.च्या सांस्कृतिक शिक्षण कार्यक्रमाबद्दल जाणूनच आहात. नुकतेच आपल्या व्हि.पी.एम.च्या विधी शैक्षणिक संस्थेला दक्षिण आशिया सांस्कृतिक अभ्यासकेंद्र, क्योटो संगयो विद्यापीठाच्या विद्यार्थी प्रतिनिधींनी भेट दिली. प्राध्यापक डॉ. मिशिओ यानो हे या प्रतिनिधींचे प्रमुख म्हणून होते. जपानचे विद्यार्थी प्रतिनिधी आमच्यासोबत होते. व्हि.पी.एम. चे संयोजक श्री. जोशीही सोबत होते. आमचे काही विद्यार्थी या प्रतिनिधी विद्यार्थ्यांना महाविद्यालयात घेऊन आले. त्या सर्वांचे स्वागत पुष्पगुच्छ देऊन करण्यात आले.

या वेळी भारतीय संविधानाची ओळख करून देण्यात आली. याचबरोबर भारतातील विविध संस्कृती विशेषतः महाराष्ट्रातील संस्कृतीविषयी माहिती देण्यात आली. एक लहानसे प्रदर्शन भरवण्यात आले; ज्यामध्ये रांगोळी, मेहंदी, साडी, दिवे इ.विषयी माहिती देण्यात आली. तांदळाची भाकरी कशी करतात याविषयीदेखील एक प्रात्यक्षिक करण्यात आले. हे प्रात्यक्षिक बघून जपानी विद्यार्थ्यांनी आश्चर्य व्यक्त केले. एवढेच नव्हे तर त्यांनी भाकरी बनविण्याचा प्रयत्नही केला आणि तिचा स्वादही घेतला. आमच्या विद्यार्थ्यांनी या जपानी विद्यार्थ्यांच्या हातावरदेखील मेहंदी काढली. काही जपानी विद्यार्थिनींनी साडी नेसून फोटोही काढून घेतले. आमच्या विद्यार्थिनींनी त्यांना साडी नेसून देण्यास मदत केली.

आम्ही त्यांच्यासाठी खास जिलेबी, बाकरवडी, बिस्कीट आणि चहाचे आयोजन केले होते. त्याचाही त्यांनी आनंदाने आस्वाद घेतला. या वेळी जपानहून आणलेली बिस्किटे व इतर पदार्थ या विद्यार्थ्यांनी आमच्या विद्यार्थ्यांना दिले. आम्हांला आशा आहे की आमच्यासोबत घालवलेला दीड तास त्यांना नक्कीच आनंदाचा गेला असेल.

## डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था, ठाणे

### ग्रंथोत्सव - पुस्तक प्रदर्शन आणि विक्री

डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्थेतर्फे ग्रंथांचे महत्त्व आणि वाचनसंस्कृतीला प्रोत्साहन देण्याच्या हेतूने दिनांक २१.०८.२०१४ रोजी पाणिनी सभागृहात सकाळी १०.०० ते सायं. ५.०० या वेळेत 'ग्रंथोत्सव' चे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात विविध आणि प्रसिद्ध प्रकाशकांच्या इंग्रजी, मराठी भाषेतील अनेकविध विषयांच्या पुस्तकांचे तसेच जर्मन, फ्रेंच, चिनी, जपानी अशा परकीय भाषेच्या पुस्तकांचे प्रदर्शन आणि विक्रीची दालने मांडण्यात आली. या प्रदर्शनामध्ये

1) Dharma Enterprises
2) Bombay Books
3) Book Access
4) Shree Ganesh Book Service
5) Pranaya Book Service
6) Shubham Books
7) Sterling book House
8) Swaraj Book Suppliers
9) Parchure Prakashan या पुस्तक विक्रेते आणि प्रकाशकांनी सहभाग घेतला. ज्ञानद्वीप महाविद्यालय संकुलातील अनेक शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी यांनी प्रदर्शनाला भेट दिली व कार्यक्रमाला चांगला प्रतिसाद दिला.

●●●

घडत असलेल्या घटना आपण कशा पाहतो आणि कशा मांडतो यालाच 'चिंतन' म्हणतात.

(पृष्ठ क्र. २ वरून - **संपादकीय**)

अर्थानेच ही तुलना ठेवणे आवश्यक आहे. डॉ. शर्मा यांच्या या परिषदेत सादर केलेल्या 'सिद्धान्तशिरोमणीमधील ग्रहगणिताकरता लागणारी उपकरणे' या निबंधात अशा उपकरणांची माहिती विस्ताराने सांगितली आहेत. वास्तविक भास्कराचार्यांच्या आधी ६००-७०० वर्षे झालेला गणिती ब्रह्मगुप्त याने आपल्या ब्रह्मस्पुटसिद्धान्तांमध्ये सुमारे नऊ यंत्रे किंवा उपकरणे यांचे वर्णन केले आहे. भास्कराचार्य आपल्या सिद्धान्तशिरोमणीमधील गोलाध्यायमध्ये 'यंत्राध्याय' या अध्यायात ब्रह्मगुप्ताप्रमाणेच ग्रहगणिताकरता लागणारी उपकरणे देतातच, शिवाय 'नाडिवलय', 'फलक' आणि 'धीयंत्र' ही नवीन यंत्रेही उद्धृत करतात. दुर्दैवाने यांतील फारच कमी यंत्रे आज भारतात दिसतात. परंतु इंग्लंड आणि युरोपमधील संग्रहालयांमध्ये ती पाहायला मिळतात. युकिओ ओहाशी या जपानी संशोधकांनी १९९४ च्या इंडियन जर्नल ऑफ हिस्ट्री ऑफ सायन्समध्ये 'सिद्धान्त' ग्रंथांमधील यंत्रांच्या वर्णनावर एक विस्तृत लेख लिहिला आहे. दुर्दैवाने आपल्या विज्ञानाच्या पुस्तकांमधून त्यांचा उल्लेख आज अभावानेच दिसतो.

भास्कराचार्यांच्या गणिती योगदानाचा अभ्यास किंवा त्याची पुरेशी ओळख ही २-३ दिवसांच्या चर्चासत्रात होणे शक्य नाही. गणित आणि संस्कृत या दोनही विषयांवर या अभ्यासाकरता प्रभुत्व असणे आवश्यक आहे. गणिताबरोबरच, भास्कराचार्यांच्या समकालीन शिक्षण, आणि समाजपरिस्थितीचाही अभ्यास होणे आवश्यक आहे. चाळीसगावजवळील पाटणे येथील मंदिरात भास्कराचार्यांचा नातू चांगदेव यांचा एक शिलालेख आहे. त्यामध्ये भास्कराचार्यांच्या लिखाणाच्या अभ्यासाकरता तेथे एक वेगळे विद्यापीठ काढल्याचा उल्लेख आहे. भास्कराचार्यांच्या आधीच्या सहा पिढ्यांचीही त्यात माहिती दिली आहे. आश्चर्याची बाब म्हणजे याआधीच्या त्यांच्या सर्व पूर्वजांनी गणित, ग्रहगणित आणि ज्योतिषावर महत्त्वाची ग्रंथरचना केली होती. एका मोठ्या ज्ञानपरंपरेची ती साक्ष आहे. भास्कराचार्य हे जन्मजात हुशार होते असे जरी मानले तरी त्यांचा वैचारिक आणि शैक्षणिक विकास हा या परंपरेतूनच झालेला दिसतो. भास्कराचार्यांचे गुरू त्यांचे वडील महेश्वराचार्य हेच होते. ग्रहगणितावर त्यांचे 'करणशेखर' आणि 'प्रतिष्ठाविधिदीपिका' हे दोन ग्रंथ नोंदविले गेले आहेत. भास्कराचार्यांच्या स्वतःच्या सांगण्यावरून त्यांनी आठ प्रकारची वेगळी व्याकरणे, सहा वैद्यक शाखा, सहा तर्कशास्त्राचे ग्रंथ, वेदवेदान्ताचे ग्रंथ एवढेच काय तर रत्नशास्त्रावरील ग्रंथांचाही अभ्यास केला होता. ज्ञान हेसुद्धा मिळवावे लागते हेच यातून सिद्ध होते. भास्कराचार्यांचा भाऊ श्रीपती यांचा नातू अनंतदेव याचाही एक शिलालेख हा पाटणेजवळील बहाल येथील मंदिरात आहे. तोही ग्रहगणित आणि ज्योतिषाचा अभ्यासक होता. १८८२-९२ च्या 'एपिग्राफिका इंडिका' या कोरीव लेखांच्या अभ्यासाकरता प्रकाशित होणाऱ्या संशोधनपत्रिकेमध्ये किलहॉर्न या ब्रिटिश अधिकाऱ्याने लेख लिहून या कोरीव लेखांवर प्रथम प्रकाश टाकला. आज पाटणे येथील हा महत्त्वाचा शिलालेखाचा दगड मूळ जागेपासून ढासळला असून आतल्या एका अडगळीच्या खोलीत त्याला ठेवण्यात आले आहे. डॉ. अरविंद जामखेडकर यांनी या परिषदेमध्ये भास्कराचार्यांच्या काळी असणारे शिक्षण आणि त्यांच्या विकासाकरता केली जाणारी मदत या विषयावर संशोधन निबंध लिहून त्यावर वेगळा प्रकाश टाकला आहे.

हस्तलिखिते असोत, शिलालेख असोत, वा छापील पुस्तके असोत, त्या सगळ्यांचे योग्य ते जतन करणे हे अत्यंत आवश्यक आहे. या साधनांमधूनच गणित काय किंवा विज्ञान काय, आपल्या संस्कृतीचा इतिहास लिहिला जातो. ठाण्याच्या प्राच्य विद्या अभ्यास संस्थेच्या ग्रंथालयातही १८५० च्या सुमाराला नक्कल केलेली लीलावतीची एक प्रत आहे. याच ग्रंथालयात आज तीन हजार संस्कृत व मराठी हस्तलिखिते आहेत. हा संग्रह जपण्याकरता ठाणे महानगरपालिका करित असलेले दुर्लक्ष हे दुःखकारक, आणि चीड आणणारे आहे. भास्कराचार्यांवर जेवढे संशोधनपर लिखाण भारतात झाले नसेल त्याहून जास्त लिखाण परदेशातील अभ्यासकांनी वेगवेगळ्या शोधपत्रिकांतून प्रकाशित केले आहे. भास्कराचार्यांच्या लिखाणाची हस्तलिखिते, त्यांवरील टीका जमवणे, त्यांची जोपासना करणे आणि शक्य असेल तर ते साहित्य प्रकाशित करणे हीच त्यांना खरी आदरांजली त्यांच्या या ९०० व्या जयंतीनिमित्त ठरेल.

**डॉ. विजय बेडेकर**

●●●

Posting under the Reg. No. MH/MR/TNC-27/2004-2006

# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

- *अत्याधुनिक दृक् श्राव्य यंत्रणा*
- *वातानुकूलित प्रसन्न वातावरण*
- *वाहने उभी करण्यासाठी प्रशस्त जागा*

*अशा सुविधांनी युक्त*

| सभागृहाचे नाव | ठिकाण | आसन क्षमता |
|---|---|---|
| थोरले बाजीराव पेशवे सभागृह | महाविद्यालय परिसर | ३०० |
| कात्यायन सभागृह | कला/वाणिज्य इमारत, ३ रा मजला | १६० |
| पातंजली सभागृह | बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय इमारत | १६० |
| पाणिनी सभागृह | डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था इमारत | १८० |
| मनु सभागृह | •वि.प्र.मं.चे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय इमारत | २५० |

## ❋ संपर्क ❋

कार्यवाह

**विद्या प्रसारक मंडळ**

विष्णूनगर, नौपाडा, ठाणे – ४०० ६०२

दूरध्वनी क्रमांक – २५४२६२७०

हे मासिक प्रकाशक आणि संपादक डॉ. विजय वासुदेव बेडेकर व मुद्रक श्री. विलास सांगुर्डेकर, परफेक्ट प्रिण्टस्, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे-४०० ६०१ या मुद्रणालयामध्ये छापून विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा ठाणे-४०० ६०२ यांच्याकरिता विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णूनगर, ठाणे - ४०० ६०२ इथून प्रकाशित केले.